बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ४३ | बुधवार,दि.४ ऑक्टोबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# जातनिहाय जनगणना करणारे बिहार पहिले राज्य: ओबीसींची संख्या ६३ टक्के

**पटणा:-** सध्या देशभर लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. या निवडणुकीच्या काही महिने आधीच बिहार सरकारने सोमवारी (२ ऑक्टोबर) जातीनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार, बिहारची एकूण लोकसंख्या १३ कोटीहून अधिक असल्याचं निष्पन्न झालं आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ६३ टक्के लोक हे इतर मागासवर्गीय (ओबीसी) समुदायाचे असल्याचे जनगणनेतून समोर आलं आहे.

या जनगणनेत असं दिसून आलं आहे की, बिहारमधील १३ कोटी लोकसंख्येपैकी अनुसूचित जातींचा वाटा १९ टक्क्यांहून अधिक आहे. तर अनुसूचित जमाती १.६८ टक्के इतके आहेत. याशिवाय राज्याच्या लोकसंख्येच्या १५.५२ टक्के लोक उच्च जाती किंवा “सवर्ण' समुदायाचे आहेत. सर्वेक्षणाच्या तपशीलवार विभाजनावरुन, राज्यात मागासवगीय लोकसंख्या २७ टक्के आहे, तर अत्यंत मागास वर्ग (EBC) ३६ टक्के इतका आहे.


बिहार सरकार
बिहार जाति आधारित गणना–2022
कोटिवार संक्षिप्त विवरणी

| क्र० सं० | कोटिवार | कुल | |
|---|---|---|---|
| | | आंकड़ा | प्रतिशत (%) |
| 1 | पिछड़ा वर्ग | 3,54,63,936 | 27.1286% |
| 2 | अत्यन्त पिछड़ा वर्ग | 4,70,80,514 | 36.0148% |
| 3 | अनुसूचित जाति | 2,56,89,820 | 19.6518% |
| 4 | अनुसूचित जनजाति | 21,99,361 | 1.6824% |
| 5 | अनारक्षित | 2,02,91,679 | 15.5224% |
| | कुल | 13,07,25,310 | 100% |

एकूण लोकसंख्येच्या तुलनेत बिहारमध्ये भूमिहार समुदाय २.८६ टक्के आहे, तर ब्राह्मण समुदाय ३.६६ टक्के आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार हे कुर्मी समाजाचे आहेत, या समाजाची लोकसंख्या २.८७ टक्के इतकी आहे. तसेच उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव हे यादव समुदायाचे असून त्यांची लोकसंख्या १४ टक्के आहे. याशिवाय राज्यात मुसाहर समाज ३ टक्के आहे.

बिहार सरकारने जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केली. प्रभारी मुख्य सचिव विवेक कुमार सिंह यांनी याबाबत एका पुस्तिकेचे प्रकाशन केले आहे. ते म्हणाले की, बिहारमध्ये २ कोटी ८३ लाख ४४ हजार १६० कुटुंबे आहेत. यामध्ये मागासवर्गीय लोकसंख्या २७.१२%, अतिमागास ३६.०१%, अनुसूचित जाती १९.६५%, अनुसूचित जमाती १.६८% आणि सर्वसाधारण प्रवर्ग १५.५२% आहे. बिहारची लोकसंख्या ८२ टक्के हिंदू आणि १७.७ टक्के मुस्लिम आहे.

बिहारमध्ये जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर झाली आहे. मोठ्या वादानंतर अखेर ही जनगणना जाहीर करण्यात आली आहे, याची आकडेवारी आता समोर आली आहे. त्यानुसार राज्यात अतिम ागासवर्गीयांची लोकसंख्या ३६.०१ टक्के आहे, तर मागासवर्गीयांची लोकसंख्या २७.१२ टक्के आहे. दोन्ही प्रवर्गांची संख्या एकत्रित पाहिल्यास अतिमागासवर्ग व मागासवर्गीयांची लोकसंख्या ६३ टक्क्यांहून अधिक असल्याचे स्पष्ट होते. राज्यातील मागासवर्गीय (OBC Politics) राजकारणाची नवी सुरुवात म्हणूनही या अहवालाकडे पाहिले जात आहे.

बिहार जातनिहाय जनगणना २०२२ ची आकडेवारी सरकारने जाहीर केली. बिहारमध्ये दोन टप्प्यांत जातनिहाय आधारित जनगणना पूर्ण झाली

**पहिला टप्पा :** पहिल्या टप्प्यातील जनगणनेला ७ जानेवारीपासून सुरुवात झाली. या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची मोजणी करण्यात आली. हा टप्पा २१ जानेवारी २०२३ रोजी पूर्ण झाला.

**दुसरा टप्पा :** १५ एप्रिलपासून सुरू जात जनगणनेचा दुसरा टप्पा १५ एप्रिलपासून सुरू झाला. जो १५ मे रोजी पूर्ण होणार होती. लोकांकडून डेटा गोळा करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात कुटुंबांची संख्या, त्यांचे राहणीमान, उत्पन्न इत्यादी माहिती गोळा करण्यात आली.

## कोणत्या वर्गाची लोकसंख्या किती

**मागासवर्गीय लोकसंख्या : ३ कोटी ५४ लाख ६३ हजार ९३६**
**अत्यंत मागासवर्गीय लोकसंख्या : ४ कोटी ७० लाख, ८० हजार ५१४**
**अनुसूचित जातीची लोकसंख्या : २ कोटी ५६ लाख ८९ हजार ८२०**
**अनुसूचित जमातीची लोकसंख्या : २१ लाख ९९ हजार ३६१**
**खुला (सवर्ण) लोकसंख्या : २ कोटी ०२ लाख ९१ हजार ६७९**
**बिहारची एकूण लोकसंख्या**
**१३ कोटी, ०७ लाख, २५ हजार ३१०**

# कंत्राटी भरतीच्या विरोधात ओबीसी संघर्ष समितीचे निवेदन
## नागपूरात विद्यार्थी संघटनांचे आंदोलन



**गोंदिया:-** कंत्राटी शासन भरतीचा शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी ३ आक्टोंबरला ओबीसी संघर्ष कृती समितीच्यावतीने कंत्राटी भरती विरोधात मुख्यमंर्त्याच्या नावे निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरती रद्द करण्यासंदर्भातील निवेदन सादर पाठविण्यात आले. शासनाचे कंत्राटी पदभारतीचा शासन निर्णय काढल्यावर बेरोजगार युवकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.राज्यात ७५ हजार जागा कंत्राटी भरतीने भरण्याचा निर्णय घेऊन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.ओबीसी बहुजन मंत्रालयासह वैद्यकीय विभागातही या जागा भरण्यासोबतच आता तहसिलदार सारखे पदंही कंत्राटी पधद्तीने भरण्याचा राज्यसरकारने घेतलेल्या निर्णयाचा निवेदनात निषेध नोंदवण्यात आला आहे.

निवेदन देतेवेळी ओबीसी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे,अमर वराडे,रुपेश कुथे,सुधीर गायधने,संदिप गाढवे,पिंटू बनकर,बबलू ढोमणे,करण टेकाम,शेखर वाळवे,संजु बहेकार,कशीश चंद्रिकापूरे,कमलबापू बहेकार,तुफानसिंह उपस्थित होते.

**नागपूर:-** कंत्राटी शासन भरतीचा शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठीआज विविध विद्यार्थी आणि युवक संघटनांकडून कंत्राटी भरती विरुद्ध पैदल मार्च व धरणे आंदोलन काढण्यात आले. शासनाचे कंत्राटी पदभारतीचा शासन निर्णय काढल्यावर बेरोजगार युवकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. या आंदोलनात जवळपास ३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी खांद्याला काळ्या फिता बांधून संविधान चौकाकडे पायदळ माच करीत धरणे आंदोलन केले व पकोडे आणि चहा विकून कंत्राटी भरतीचा निषेध केला.

स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया, युवा ग्राज्युएट फोरम, ओबीसी युवा अधिकार मंच, महाविधी लॉ असोसिएशन, डॉ. बाबसाहेब आंबेडकर विद्यार्थी संघटना, स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन संघटनांचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोर्राम, मंगेश नागदेवे, राहूल हनवते, कृतल आकरे,पियूष आकरे,अतुल खोब्रागडे,प्रा.रमेश पिसे,अनुप खड्ककर, पंकज सावरबांधे, निकेश पिने, देवेंद्र समर्थ,धीरज भिसिकर,मनीष गिरडकर, गौतम कावरे, नयन कालभांडे, अनुप खड्ककर, सोनू फटींग, निता मडावी, प्रफुल ढेंगरे, रोहित उंदीरवाडे,निखिल रामटेके,मनोज गजभिये,प्रवीण भरणे, अमित सवाई,चिंटू बेलेकर,चाहत सरदारे,रंजना सूर्जुसे, आकाश वैद्य,मनीष गिरडकर, लखन इंगळे,प्रकाश वाघमारे,रजत मालसा उपस्थित होते.




# शाळा टिकू द्या, खासगीकरणाविरोधात गोंदियात शिक्षकांचा महाआक्रोश मोर्चा




**गोंदिया:-** “आम्हाला फक्त शिकवू द्या–जिल्हा परिषद शाळा टिकू द्या” अशी आर्त हाक देत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने विराट महाआक्रोश मोर्चा महात्मा गांधी जयंती दिनी सोमवार २ ऑक्टोबर रोजी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चाला जिल्हाभरातील शिक्षक संघटनांनी पाठींबा जाहीर केला होता. शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर बावणकर, नेते विरेंद्र कटरे, एस.यू.वंजारी, केदार गोटेफोडे, अनिरुद्ध मेश्राम, चंद्रशेखर दमाहे, शंकर चव्हाण, शिक्षक भारतीचे विभागीय अध्यक्ष प्रकाश ब्राम्हणकर, जुनी पेंशन हक्क संघटनेचे शितल कनपटे, महाराष्ट्र राज्य पुरोगामी समिती संघटनेचे हरिराम येळणे, शिक्षक संघाचे सरचिटणीस अरविंद उके, चेतन उईके, यशोधरा सोनेवाने, राष्ट्रीय संघटक नूतन बांगरे, राज्य उपाध्यक्ष आयुब खान, वाय.एस.भगत, राज्य कार्यकारिणी सदस्य उमाशंकर पारधी, अनिरुद्ध मेश्राम, जिल्हा सरचिटणीस अरविंद उके, जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत पटले यांनी मोर्चाचे नेतृत्व केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने सोमवार २ रोजी शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांच्या मार्गदर्शनात शिक्षक संघाचे जिल्हाप्रमुख किशोर बावनकर यांच्या नेतृत्वात महा आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरातील सर्व शिक्षकांनी हजारोंच्या संख्येने या महाआक्रोश मोर्चात सहभागी होत आपला निषेध नोंदवला. मोर्चा प्रशासकीय इमारतीसमोरील भारतरत्न डॉ.आंबेडकर चौकातून फुलचूर नाका होत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्च्याच्या सभास्थळी गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांनी भेट देत शिक्षकांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करीत शासनाकडे त्यांच्या मागण्यावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. महामोर्च्याच्या आयोजनाकरीता सर्व सहभागी शिक्षक संघटनांच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## या नऊ संघटनांनी दिला आंदोलनाला पाठिंबा

**शिक्षक संघाकडून काढण्यात आलेल्या महाआक्रोश मोर्चाला महाराष्ट्र जुनी पेन्शन हक्क संघटना, महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना, शिक्षक भारती संघटना, पदवीधर विषय शिक्षक संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, शिक्षक सहकार संघटना, विदर्भ मागासवर्गीय संघटना, जनता शिक्षक महासंघ, कृती महासंघ गोंदिया या नऊ संघटनांनी या मोर्चात सहभाग नोंदविला होता.**

# नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील सफारी सुरु कोका सफारी लांबणीवर

**गोंदिया :** नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या वार्षिक वेळापत्रकानुसार ३० जून रोजी जंगल सफारी बंद करण्यात आली. १ ऑक्टोबरपासून तीन महिन्यांनी पर्यटकांसाठी ही जंगल सफारी सुरू झाली आहे. मात्र व्याघ्र प्रकल्पांतर्गत असलेले कोका अभयारण्य सततच्या पावसामुळे पर्यटकांसाठी खुले होऊ शकले नाही. ते उघडण्यासाठी आणखी काही दिवस लागतील.

कोका अभयारण्य जिल्हा मुख्यालयापासून २० किमी अंतरावर आहे. या अभयारण्यात वाघ, हरीण, बिबट्या, अस्वल यासह विविध वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. घनदाट जंगल आणि अनेक जलाशय आहेत. त्यामुळे पर्यटक कोका अभयारण्याकडे आकर्षित होत आहेत.

पावसाळा सुरू होताच ३० जून ला त्यानंतर तीन महिन्यांनी १ ऑक्टोबरला जंगल पुन्हा पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. मात्र यावेळी सप्टेंबर महिन्यात दोन्ही जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. यापुढेही पावसाची शक्यता कायम आहे. त्यामुळे अभयारण्याचे रस्ते पुरते खराब झाले आहेत. सर्वत्र पाणीच पाणी आणि चिखल आहे. त्यामुळे पर्यटकांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पाऊस न आल्यास येत्या आठवडाभरात कोका अभयारण्यात जंगल सफारी सुरू होऊ शकते. अन्यथा १५ ऑक्टोबरपासून पर्यटकांना जंगलात नक्कीच जाता येणार आहे.

दरम्यान, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पांतर्गत पिटेझरी आणि गोठणगाव गेट पासून जंगल सफारी सुरू झाली आहे. पावसाच्या परीस्थितीनुसार पर्यटन त्याची स्थिती पाहून नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटन ऑफलाईन पध्दतीने सुरु राहील. त्या अनुषंगाने येथील पर्यटनातून स्थानिकांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध होईल यासाठी व वनसंरक्षण आणि संवर्धन यात स्थानिकांचा सहभाग वाढविण्यासाठी नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या मंजूर व्याघ्र संवर्धन आराखड्या प्रमाणे नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझीरा व नविन नागझीरा अभयारण्या अंतर्गत (नागझिरा ब्लॉक मध्ये) येत असलेल्या पिटेझरी, मंगेझरी, चोरखमारा १ व चोरखमारा– २ या प्रवेशव्दारा वरुन पुढील आदेशापर्यंत पर्यटनाकरीता नवेगाव–नागझिरा व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानात नोदणीकृत जिप्सी व तत्सम पर्यटन वाहन अनिवार्य करण्यात आले आहे.

## पाऊस थांबल्यावरच सफारी सुरू होणार

**कोका अभयारण्यात जंगल सफारी सुरू करण्याची तयारी करण्यात आली आहे. मात्र पावसामुळे काही रस्ते ओले आहेत. चिखल पण आहेच, अशा परिस्थितीत काही दिवस थांबून कोरड झाल्यानंतरच जंगल सफारी सुरू केली जाईल.मात्र नवीन नागझीरा चे पिटेझरी, मंगेझरी, चोरखमारा १ व चोरखमारा– २ या प्रवेशव्दारा वरुन ऑफलाईन प्रवेश सुरु राहणार आहे, असे नवेगांव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रचे सहायक उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पवन झेप यांनी सांगितले.**

# यात्रा काढून भाजपने ओबीसी जनगणनेपासून पळ काढू नये-वडेट्टीवार



**नागपूर :** बिहार सरकारने सोमवारी (२ ऑक्टोबर) जातीनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार, बिहारची एकूण लोकसंख्या १३ कोटीहून अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ६३ टक्के लोक हे इतर मागासवगीय (ओबीसी) समुदायाचे असल्याचे जनगणनेतून समोर आले आहे. ही आकडेवारी जाहीर होताच महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणनेची मागणी जोर धरू लागली आहे.

महात्मा गांधी यांच्या जयंतीचे निमित्त साधून भाजपने आज सेवाग्राम येथून ओबीसी जागरण यात्रेला प्रारंभ केला. त्यावर विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रहार केला. ते म्हणाले, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेत जातनिहाय जनगणेची मागणी केली. त्याशिवाय ओबीसींचे आकडेवारी समोर येऊ शकत नाही. पण, केंद्र सरकार जातनिहाय जनगणा करण्याचे टाळत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका ओबीसी विरोधी असून त्यांचा जातनिहाय जनगणेला विरोध आहे. केंद्र सरकार मनुवादी सरकार चालवणार की, बहुजनवादी असा सवालही वडेट्टीवार यांनी केला. तसेच भाजपने ओबीसी जागरण यात्रा काढून लोकांची डोळ्यात धुळफेक करू नये., जातनिहाय जनगणेपासून पळ काढू नये, टीकाही त्यांनी केली.

# जवानाचा शिमला येथे हृदयविकाराने मृत्यू



गोंदिया : सेनेत कार्यरत जवानाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचीघटना मंगळवारी (दि.३) सकाळी हिमाचल प्रदेशातील शिमला येथे घडली.देवीप्रसाद लिल्हारे रा. महालगाव, ता .जि. गोंदिया असेहृदयविकाराच्या धक्क्याने निधन झालेल्या जवानाचे नाव आहे.

देवीप्रसाद हे शिमला येथे भारतीय सैन्यदलात हवालदार पदावर कार्यरत होते.मंगळवारी सकाळी ते मैदानावर कवायत करीत असताना त्यांना हृदयविकाराचा धक्का बसला.यातच त्यांचीप्राणज्योत मालवली.

शासकीय सोपस्कार पार पाडल्यानंतर बुधवारी (दि .४) ऑक्टोबर रोजीत्यांचा मृतदेह त्यांच्या स्वगावी महालगाव येथे आणण्यात येणार आहे.या नंतरशासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडणार असल्याची माहितीत्यांच्या कुटुंबीयांनी दिली.

# स्वच्छतेच्या प्रति जागरुक रहा!-अनिल पाटील



**गोंदिया :** महात्मा गांधी यांनी ज्या भारताचे स्वप्न पाहीले होते त्यामध्ये फक्त राजकीय स्वातंत्र्य नव्हते; तर त्यासोबत एक स्वच्छ व विकसीत देशाची कल्पना पण होती. महात्मा गांधींनी पारतंर्त्याच्या जोखडातून भारतमातेला मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून दिले. आता भारतमातेला अस्वच्छतेतून मुक्ती देवून देशाची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी स्वच्छतेच्या प्रति जागरुक रहा, असे आवाहन गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत परिसरात महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांना त्यांच्या जयंतीनिमीत्त (ता.२) अभिवादन करण्यात आले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) नरेश भांडारकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (महीला व बालकल्याण) संजय गणवीर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. महेंद्र गजभिये, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) दिनेश हरीणखेडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, कृषी विकास अधिकारी महेंद्रकुमार मडामे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) सुमित बेलपत्रे, कार्यकारी अभियंता (समग्र शिक्षा) जीवनेश मिश्रा यावेळी उपस्थित होते.

पाटील पुढे म्हणाले, ‘की मी घाण करणार नाही, आणि कुणालाही घाण करू देणार नाही. हा संकल्प प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करायला हवा. स्वच्छतेची सुरवात स्वत:पासून, स्वत:च्या कुटूंबापासून करुन, आपली गल्ली, वॉर्ड, वस्ती आणि मुख्य म्हणजे कार्यस्थळ सुध्दा स्वच्छ ठेवायला हवे.’ राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करुन ‘स्वच्छ भारत दिवस’ या कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

दरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना आठवडयातून दोन तास श्रमदान करुन स्वच्छतेचा संकल्प पूर्ण करण्याची शपथ दिली. याप्रसंगी तबाखू मुक्त जीवन करण्याची शपथ सुध्दा घेण्यात आली. संपूर्ण देशात स्वच्छता ही सेवा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हयात १ ऑक्टोबर रोजी मोठयाप्रमाणात श्रमदान करण्यात आले. ही आंनदाची बाब आहे. स्वच्छता ही व्यक्तीचे आत्मदर्शन घडविते. आपला सर्वाधिक वेळ प्रशासकीय भवनामध्ये जातो. त्यामुळे हा परिसर नेहमीच स्वच्छ राहील यासाठी, प्रत्येक कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेचा संकल्प तडीस नेण्याचे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) नरेश भांडाकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माहीती, शिक्षण व संवाद तज्ञ अतुल गजभिये यांनी केले. दरम्यान जिल्हा परिषद परिसरात श्रमदान करुन प्लास्टीकचे संकलन करण्यात आले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहायक प्रशासन अधिकारी श्री. मडावी, स्वीय सहायक यज्ञेश मानापुरे, शिक्षण विभागाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी सौरभ अग्रवाल, माहीती, शिक्षण व संवाद तज्ञ राजेश उखळकर, शालेय स्वच्छता तज्ञ भागचंद रहांगडाले, पाणी गुणवत्ता तज्ञ मुकेश त्रिपाठी, मुल्यमापन व सनियंत्रण तज्ञ विशाल मेश्राम, सर्व शिक्षा अभियानाचे जिल्हा समन्वयक बाळकृष्ण बिसेन, प्रोग्रामर नितेश खंडेलवाल, सहायक कार्यक्रम अधिकारी दिलीप बघेले, मनोज शेदमारे, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठयासंख्येने उपस्थित होते.

## प्लास्टीक संकलन

**स्वच्छ भारत दिवस निमीत्ताने जिल्हा परिषद परिसरात प्लास्टीक कचऱ्यांच्या संकलनावर भर देण्यात आला. याप्रसंगी प्रशासकीय इमारत परीसरात इतरत्र पसरलेला केरकचरा विशेषत: प्लास्टीक पिशव्या, बॉटल्स, प्लास्टीकचे कप, ग्लास आणि इतर वस्तू गोळा करुन त्याचे व्यवस्थापन करण्यात आले. दरम्यान परिसरातील गवत, खुरटे, पाळापाचोळा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे.**

# पाच महिन्यांत २० हजार रुग्णांची नोंद...




**गोंदिया:** राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार पालक असलेला गोंदिया जिल्हा एका मोठ्या भयंकर आजाराने ग्रस्त झाला आहे. कोरोनानंतर आदी गंभीर ठरलेला “मानसिक रोग' या हा आजाराने गोंदियाकरांना घेरले आहे. गेल्या पाच महिन्यांत तब्बल २० हजार मानसिक रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कोरोनाप्रमाणे या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी जिल्हा प्रशासन युद्ध पातळीवर काम करीत आहे. गोंदिया जिल्ह्यात आर्गेनिक मेंटल डिसिज, दारुमुळे मानसिक रोगी होणे, स्मृतिभ्रंश, भीती वाटणे, दूधवीय आजार, स्किझोफ्रेनिया, उदासीनता, व्यसनाधीनता, अपस्मार (मिरगी), गतिमंद, निद्रानाश व इतर अनेक प्रकारचे मानसिक आजार लोकांना होताना दिसत आहेत.

गोंदिया जिल्ह्यात २०२३ मधील एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांची परिस्थिती पाहता तब्बल २० हजार २८१ जण मानसिक रुग्ण असल्याची आकडेवारी पुढे आली आहे. कोरोनापासून ही आकडेवारी झपाट्याने वाढत आहे. याहूनही अधिक मानसिक रुग्ण असून, या रुग्णांच्या चार पट मानसिक रोगी जिल्ह्यात असल्याचे समजते. पाच महिन्यांतील मानसिक रोगी असल्याची आकडेवारी ही २० हजारांवर असून, ही फक्त शासकीय रुग्णालयातील आकडेवारी आहे.

खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्यांची संख्या अजूनही पुढे आलेली नाही. हा आजार किती झपाट्याने वाढत आहे. दरम्यान, झोप येत नाही, निराश वाटते, मानसिकग्रस्त, वैफल्य, कौटुंबिक तणाव, प्रेम प्रकरणं व कर्जाचे डोंगर अशा विविध कारणांनी तणावात वावरणारे गोंदियाकर मानसिक रोगी होऊ लागले आहेत. यात संयम न बाळगता धीर सोडणा?या व्यक्तींना आत्महत्या हाच एकमेव मार्ग दिसत असतो. त्यामुळे हा आजार किती भयंकर आहे हे लक्षात येते.

विशेष म्हणजे कोविड काळात गोंदियाकरांचे मानसिक आरोग्य बिघडून गेले होते. अनेक जण कोविडच्या भीतीमुळे मनातून खचून गेले आहेत. सतत मानसिक तणावात राहता राहता हजारो लोक मनोरुग्ण होऊ लागले आहेत. जिल्ह्यात अवघ्या पाच महिन्यांत तब्बल २० हजार २८१ लोकांनी मानसिक आजारावर उपचार घेतल्याची ही आकडेवारी बाहेर आली. दरम्यान, पालकमंत्री या नात्याने सुधीर मुनगंटीवार यांनी वेळीच लक्ष घालून गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांची काळजी घेणे गरजेचे झाले आहे.

## संपादकीय

### शाळेचे खाजगीकरण; देशाचा विनाश अटळ!

शक्तीपेक्षा युक्ती नेहमीच श्रेष्ठ मानली जाते. हत्ती मानवापेक्षा कितीही ताकदवान असला, घोडा किती चपळ व मजबूत असला आणि बैल भली मोठी बैलगाडी ओढत असला तरी यांच्या ताकदीपुढे मानवाची युक्ती श्रेष्ठ असल्यामुळे त्यांना आपल्या ताब्यात ठेवण्याची (गुलाम बनविण्याची) किमया मानवाने साध्य केली आहे. एखाद्या देशाला युध्द करुन पराजित करण्यापेक्षा डोके वापरून तेथील जनतेला फुकटच्या अन्नधान्याची सवय लावून आणि शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते. सध्या भारताची आणि महाराष्ट्राची वाटचाल गुलामगिरीच्या दिशेने सुरु झाली आहे. सध्याचे सरकार हे जनतेचे सरकार नसून व्यापाऱ्यांचे सरकार आहे. एकीकडे मराठा, धनगर आणि ओबीसींना आरक्षणाचे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सरकारी नोकरी बंद करुन खाजगी ठेकेदारांकडून नोकर भरती करायची. तसेच णझडउ विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरुन सचिव पदांच्या खाजगी भरती करायच्या. त्याचबरोबर सर्व सरकारी शाळांचे खाजगीकरण करुन सरकार शिक्षण हक्क कायद्याला फाट्यावर मारुन मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यापासून पळ काढत आहे. हि अतिशय धक्कादायक बाब असून देशाची वाटचाल गुलामगिरीच्या दिशेने सुरु झाली आहे.

विद्यार्थी आणि तरुण हे देशाचे भविष्य मानले जाते. म्हणून भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार १४ वर्षाखालील प्रत्येक मुला/मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे हे केंद्र आणि राज्य सरकारला बंधनकारक आहे. “शिक्षण हक्क कायदा २००९” नुसार शिक्षण मिळणे हा बालकांचा मूलभूत अधिकार आहे. स्वतःला विश्वगुरु म्हणणाऱ्याच्या देशात ८० टक्के जनता ही गरीब आहे. या गरीब जनतेची मुले सरकारी शाळेत शिक्षण घेत आहेत. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, हे दुध जो प्राशन करतो तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही. असे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षणाचे महत्व जाणून महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी ब्राम्हण समाजाचा त्रास सहन करुन त्यावेळी मुला/मुलींना शिक्षण दिले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही शिक्षणाला महत्व दिले होते. त्यांनी तर “रयत शिक्षण संस्थेची” स्थापना केली होती. “कमवा आणि शिका” या तत्वज्ञानाची सुरुवात करुन त्यांनी मागास जाती आणि अल्प उत्पन्न असलेल्या लोकांना शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. छत्रपती शाहु महाराज यांनीही शिक्षणाला महत्व दिले. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरूकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का आणि कसे जगावे? जीवनाची सार्थकता कशात आहे? जीवन पूर्ण कसे करावे? आपण जीवनातून काय घ्यावे आणि इतरांना काय द्यावे, या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजेच “शिक्षण” होय. शिक्षणामुळे माणूस हुशार होत असून गुलामगिरीच्या बेड्या तो झूगारू शकतो. म्हणून पूर्वीच्या काळी ब्राम्हण व्यतिरिक्त कोणत्याही बहुजन मुलांना शिक्षण घेण्यास बंदी होती. (बहुजन म्हणजे शुद्र नसून बारा बलुतेदार, अठरा पगड जाती तसेच ब्राम्हण सोडून सर्व जाती म्हणजेच बहुजन होय. हल्लीच्या लोकांना बहुजन या शब्दाचा अर्थ कळत नाही.) मात्र, हल्लीची बहुजनांची मुले शिक्षण घेऊन पुढे जात असल्यामुळे नोकरी आणि शिक्षणात खाजगीकरण करुन बहुजनांच्या मुळावरच घाव घातला जात आहे.

सरकारने नुकतेच सरकारी जिल्हापरिषद ६२ हजार शाळांचे खाजगीकरण करण्याचा जी.आर. काढला आहे. व्यापाऱ्यांनी ठराविक पैसे देऊन शाळेला आपले नाव देणे. ती शाळा चालविणेची जबाबदारी घेणे. त्यांच्या पैशातून शाळांची सुधारणा करुन दर्जेदार शिक्षण देणे ही सरकारची योजना आहे. परंतु, ही योजना वरवर जरी चांगली दिसत असली तरी गरीब मुलांना शिक्षणापासुन वंचित ठेवण्याचे खतरनाक षडयंत्र आहे. सुरवातीला गळे ने फ्री सिमकार्ड वाटले आणि त्यानंतर कसे रिचार्ज वाढवित गेले हे आपण पाहतच आहोत. त्यानुसारच सुरवातीला चांगले शिक्षण द्यायचे आणि मग नंतर परवडत नाही असे बोलून त्याच सरकारी शाळेचे खाजगी शाळेत रुपांतर करुन मोठ्ठाली फी उकळायची. आणि मग गरिबांकडे पैसे नाही म्हणून त्यांनी शाळेत येणे बंद केल्यावर तीच अशिक्षित मुले गुन्हेगारीकडे वळतील किंवा गुलामगिरी पत्करतील. त्यानंतर पुढे गुलामांच्या पिढ्या जन्माला येतील.

देशाला खरच विश्वातील महान देश बनवायचे असेल तर प्रथम मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबरोबरच आरोग्य सुविधाही मोफत पुरवायला हव्यात. अन्नधान्य, विज आणि इतर काहीही मोफत देण्यापेक्षा शिक्षण आणि आरोग्य मोफत दिल्यास देशातील प्रत्येक व्यक्ती सक्षम होईल. त्याला फुकटच्या गोष्टींची गरजच भासणार नाही. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात बुध्दीजीव जमात तयार होईल. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत जगात फक्त भारताचाच डंका वाजेल. भारताचा रुपया जगावर राज्य करेल. पाकिस्तान, चीन तर सोडाच जगातील एकही देश वाकड्या नजरेने भारताकडे बघण्याची हिंम्मत करणार नाही. नुसती स्वतःच विश्वगुरु असल्याची छाती ठोकून काहीच फायदा नाही. यासाठी जगाने तुम्हाला विश्वगुरु मानले पाहिजे. सध्या देशात आणि महाराष्ट्रात जे चालले आहे ते वाईट आहे. यावर आवाज उठविणे अत्यंत गरजेचे आहे. शाळांचे खाजगीकरण करतानाच शिक्षकांनाही देशोधडीला लावण्याचे षडयंत्र आहे. इतर खाजगी शाळा लाखोंची फी घेऊन दर्जेदार शिक्षण देतात. मात्र, सरकारी शाळेचे खाजगीकरण केल्यानंतर कमी वेतनात शिक्षकांची नेमणूक केली जाईल. मग तो आर्थिक विवंचनेत असलेला शिक्षक काय खाक विद्यार्थ्यांना शिकविणार? म्हणून प्रथम शिक्षकांनी संघटित होऊन रस्त्यावर उतरले पाहिजे. रस्त्यावर उतरतांना समाजातील प्रत्येक घटकांना याचे गांभीर्य निर्दशनास आणुन त्यांनाही आंदोलनात सहभागी करुन घ्यावे. तरच सरकार नमेल. अन्यथा गुलामगिरी पत्करून गुलामांच्या पिढ्या तयार होतील हे लक्षात घ्यावे!

# निवडणुकीपूर्वी जुन्या पेन्शनसाठी रामलीला मैदानावर एकवटले सरकारी कर्मचारी

**नवी दिल्ली:** रविवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर लाखो सरकारी कर्मचारी एकत्र आले. जुनी पेन्शन लागू करावी, अशी त्यांची मागणी आहे. नॅशनल मूव्हमेंट फॉर ओल्ड पेन्शन स्कीमशी संबंधित संघटना या रॅलीत सहभागी झाल्या आहेत. दिल्ली पोलिसांनी मैदानात तंबू उभारण्यास परवानगी दिली नाही असे असतानाही मोठ्या संख्येने कर्मचारी रॅलीत सहभागी झाले होते.



**देशातील ५ राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना**

**राजस्थान**–ओल्ड एज पेन्शन (ओपीएस) लागू करणारे राजस्थान हे पहिले राज्य आहे. २०२३-२४ मध्ये राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी नवी पेन्शन योजना रद्द करुन जुनी पेन्शन बहाल करण्याची घोषणा केली होती.

**छत्तीसगड**–यावर्षी जानेवारीमध्ये अर्थसंकल्पाच्या घोषणेनंतर छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेले यांनी कर्मचाऱ्यांना नवीन आणि जुनी पेन्शन योजना निवडण्याचा पर्याय दिला. नवीन पेन्शनसाठी राज्याने दिलेले योगदान आणि त्यावर मिळणारा लाभांश जमा केल्यानंतर कर्मचारी पुन्हा ओपीएस मध्ये जाऊ शकतात. असा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला होता.

**झारखंड**–१ सप्टेंबर २०२२ रोजी झारखंड मंत्रीमंडळाने जुनी पेन्शन योजना पुनर्संलित करण्यास मंजूरी दिली. हेमंत सोरेन सरकारने त्यांच्या राज्यात ओपीएस लागू करण्याचे निवडणूक आश्वासन दिले होते.

**पंजाब**–पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये राज्यात जुनी पेन्शन योजना लागू केली. जुनी पेन्शन योजना आणण्यासाठी पंजाब सरकारने तीन राज्यांमध्ये (राजस्थान, छत्तीसगड, झारखंड) अभ्यास पथक पाठवले होते.

**हिमाचल प्रदेश**–हिमाचल प्रदेश सरकारने ५ मे रोजी जुनी पेन्शन लागू करण्याची अधिसूचना जारी केली होती. यासाठी राज्य सरकारने केंद्रीय नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९७२ मध्ये सुधारणा केली आहे.

### जुनी पेन्शन योजना २००४ मध्ये बंद, एनपीएस लागू

जुनी पेन्शन योजना म्हणजेच जुनी पेन्शन योजना (ओपीएस) २००४ पुर्वी सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर निश्चित पेन्शन देत असे. ही पेन्शन कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीच्या वेळीच्या पगारावर आधारित होती. या योजनेंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियानाही पेन्शनचा लाभ दिला जाता होता. तथापि अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारने १ एप्रिल २००४ रोजी जुनी पेन्शन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर २००४ मध्ये जुन्या पेन्शन योजनेच्या जागी राष्ट्रीय पेन्शन योजना सुरु करण्यात आली.

# बिरसी विमानतळ परिसरातील रस्ते वळविण्यासाठी १०३ कोटी निधी द्या; परिणय फुकेंची मागणी

**गोंदिया :** तालुक्यातील बिरसी विमानतळाच्या धावपट्टीतून जाणारा खातिया बिरसी कामठा राज्य महामार्ग आणि कामठा परसवाडा मुख्य जिल्हा मार्ग वळविण्यासाठी आवश्यक क्षेत्र संपादन व रस्ता बांधकामासाठी १०३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी माजी पालकमंत्री परिणय फुके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी गोंदियाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासाठी अपर मुख्य सचिव आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विमान कंपनी, मर्यादित मुंबई यांना प्रस्तुत केला आहे. मात्र, या प्रस्तावाला राज्य शासनाकडून प्रशासकीय व आर्थिक मान्यता न मिळाल्याने काम रखडले आहे. याप्रकरणी माजी पालकमंत्री तथा माजी वन व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री डॉ. परिणय फुके यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन गोंदियाच्या बिरसी विमानतळाच्या धावपट्टीवरून जाणारे दोन मार्ग वळविण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

रस्ते बांधकाम व शासकीय वनजमीन, विनामोबदला हस्तांतरित करण्याची व शासनस्तरावर तातडीने निधीची तरतूद करण्याची मागणी सी करण्यात आली आहे. फुके यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रातून दोन्ही रस्त्यांच्या बांधकामाचा सविस्तर प्रस्ताव अतिरिक्त मुख्य सचिव, विमान वाहतूक मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी पाठविण्यात आला असल्याचे सांगितले.

**प्रस्तावात नेमके काय :**

प्रस्तावांतर्गत, १५.५३.९४ हे. आर. चौरस मीटर खाजगी जमिनीच्या संपादनासाठी १९ कोटी १८ लाख ५५ हजार ७६८ रु., कामठा बिरसी कामठा राज्य महामार्ग या दोन रस्त्यांच्या पुनर्बांधणीसाठी ७९ कोटी ९६ लाख रुपये, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड, मुंबईच्या आस्थापना खर्चातून ३ कोटी ९६ लाख ५८ हजार २३१ रुपये, खातिया बिरसी– कामठा राज्य महामार्गावर येणा?्या कामठा गावाची ०.९३ हेक्टर. आर. वनजमीन क्षेत्रातील निर्वाणीकरण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता आणि बिरसी गावात ३.७१ हेक्टर. आर. व खातिया येथे १.२०३१ हेक्टर आर. आणि कामठा ०.५६ हेक्टर आर असे एकूण क्षेत्र ५,४७३१ हेक्टर आर. चौरस मीटर शासकीय जमीन विना मोबदला हस्तांतरित करून एकूण १०३ कोटी ११ लाख १३ हजार ९९९ रुपयांचा निधी तातडीने मंजूर करून देण्याची मागणी केली. यावर ना. फडणवीस यांनी सकारात्मक मार्ग काढून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचा मोठा प्लॅन!

**मुंबई:** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपचं मिशन ४५ प्लस सुरू झालं आहे. लोकसभेत भाजपच्या जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मोठा प्लान आखला आहे. या प्लाननुसार भाजप चक्क लोकप्रिय आमदारांनाच लोकसभेच्या रिंगणात उतरवणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रात यावेळची लोकसभा निवडणूक अत्यंत चुरशीची तसेच लक्षवेधी ठरणार आहे. लोकसभेसाठी भाजपने विद्यमान खासदारांना तिकीट देतानाच राज्यातील ७ ते ८ आमदारांना तिकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राज्यातील लोकप्रिय आमदारांची यादी तयार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपचे लोकप्रिय आमदार सुधीर मुनगंटीवार, संकटोमोचक गिरीश महाजन, आमदार आकाश फुंडकर, रवींद्र चव्हाण, संजय केळकर आणि राम सातपुते यांना लोकसभेचं तिकीट देण्यात येणार आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही भाजप लोकसभेच्या मैदानात उतरवणार असल्याचं कळतंय. हे सातही आमदार लोकसभेच्या मैदानात उतरल्यास अत्यंत चुरशीची निवडणूक होणार असल्याचंही स्पष्ट होत आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रात भाजपच्या मिशन ४५ बद्दल माहिती दिली होती. लोकसभेत जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा भाजपचा प्रयत्न असेल, असं बावनकुळे यांनी म्हटलं होतं.

# ज्येष्ठ नागरिकांनी स्वत:ला म्हातारे समजू नये-एड.लखनसिंह कटरे

**गोंदिया** – वय वाढत जाऊन कधी ना कधीं वृद्धत्वाकडे वाटचाल करावी लागेल परंतु मनात आपण वयाचे ६० वे वर्ष झाले की आता आपण म्हातारे झालो, आता सर्व संपले , आपण काहीच करण्याजोगे राहिलेलो नाहीत असे समजतो. असे कधीही मनात येऊ देऊ नका व स्वतःला म्हातारे झालो अशी समज मनातून काढून टाका , असे आवाहन गोंदिया जिल्ह्यातील ज्येष्ठ विचारवंत व गोंदिया जिल्हा ज्येष्ठ नागरिक सेवा समितीचे कार्याध्यक्ष लखनसिंह कटरे यांनी केले . ते मफ ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते




सामाजिक न्याय विभाग व ज्येष्ठ नागरिक सेवा संघ गोंदियाचे वतीने पंचायत समिती गोंदियाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते . कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुणेशभाऊ राहंगडाले , सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे, महिला अर्बन को- ऑप बँकेच्या अध्यक्षा डॉ. माधुरी नासरे वरिष्ठ समाजसेवक भरत क्षत्रिय , इंजि. संजय कटरे , अनुप शुक्ला व प्रभाकर वऱ्हाडे तसेंच बहुसंख्येने ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात गोंदिया जिल्ह्यातील ९९ वर्षीय बाबुलाल गजनलाल ठाकुर, ८३वर्षीय मधुकर नारायणराव नखाते , ८६वर्षीय प्रा. धनराज ओक , ८५ वर्षीय श्रीमती निलाताई ढोक,९४वर्षीय एच. एम. ठाकूर यांचा शाल , श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव दुलीचंद बुधे यांनी केले व सर्वांनी ज्येष्ठ नागरिक म्हणून एकमेकांच्या सुख व दुखात सहभागी होण्याचे व शासकीय योजनेचा वापर करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले . कार्यक्रमाचे संचालन प्रा. मंजुश्री देशपांडें यांनी केले तर आभार इंजि. संजय कटरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिलीप देशमुख , मधुकर चौरागडे, विठ्ठलरावं भरणे , श्रावण सिंगनजूडे , मनोहर लाडेकर ,शरद क्षत्रिय, सिद्धार्थ मेश्राम , तुळशीदास झंझाड अनुप शुक्ला, लिलाधर पाथोडे,पुरूषोत्तम मेंढे,रामेस्वर लिलारे,सजंय कटरे,सामाजिक न्याय विभागाच्या कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# कारंजातील अबिंका वाचनालयातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**गोंदिया:** तालुक्यातील अंबिका सार्वजनिक वाचनालय कारंजा येथे ०२ आक्टोबरला राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे होते. अतिथी म्हणून प्रमुख अतिथी श्रीमती अस्मिता मंडपे व सरपंच नोकचंद कापसे, उपसरपंच विठ्ठलराव हरडे, पोलीस पाटील अल्काताई रंगारी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुभाष मळावी व सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.




यावेळी मार्च २०२३ मध्ये प्रथम आलेल्या गावातील वर्ग १२ वी चा विद्यार्थी आलोक वसंत रहमतकर व वर्ग १० वीला प्रथम आलेला पराग राजेंद्र रहमतकर तसेच स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा येथील प्रथम आलेली कु.आचल संकर टालटे या विद्यार्थ्यांचे स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जि.प.सभापती संजय टेंभरे यांनी वाचनालयाचे कार्याबद्दल कौतुक करीत वाचनालय सुसोभीत करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली. कार्यक्रमाला सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष फ नेंद्र हरिणखेडे, उपाध्यक्ष विठ्ठलराव हरडे,मारोती भिमटे, विजय वाघाडे, विनायक चव्हाण, सचिव टेकचंद बलभद्रे व गावातील सामाजिक कार्यकर्ते शिवलाल ढेकवार, श्रीराम रहमतकर, माजी सरपंच धनवंताबाई उपराळे, महेन्द्र शहारे, लोकेश उपराळे, अरविंद हरडे, मीताराम हरडे, गोपाल हजारे, राजू पेशने, कारुजी रहमतकर, डिगाराम डिबे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक दिनेश रहमतकर, कन्हैयालाल रहमतकर, मनोहर बघेले, रामू उके व गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक चव्हाण यांनी केले. प्रस्तावना संस्थेचे सचिव टेकचंद बलभद्रे यांनी केले व आभार संस्थेचे अध्यक्ष फनेंद्र हरिणखेडे यांनी मानले. कार्यक्रमाला वाचनालयाचे ग्रंथपाल श्रीमती ममताताई रहमतकर शेखर उपराळे व सर्व ग्रामपंचायतींचे कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ई-पीक नोंदणी विसरले तर सरकारी मदत विसरा

**गोंदिया :** शासनाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधा तसेच शेत पीक अनुदान मिळण्यासाठी ई-पीक नोंदणी आवश्यक आहे. यंदा यासाठी २५ सप्टेंबरची मुदत देण्यात आली होती. या काळात गोंदिया जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार शेतकऱ्यांनी ई - पीक नोंदणी केल्याचे दिसून येत आहे. खरीप व रब्बी या दोन्ही हंगामामध्ये शेतकऱ्यांना आपल्या पिकाची नोंद करण्यासाठी दरवर्षी ई-पीक पाहणी पूर्ण करावी लागते. यंदा १ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर असा ४५ दिवसांचा कालावधी ई-पीक नोंदणी करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता. मात्र, विविध कारणांनी ई- पीक अपवर नोंदणी करताना अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे अनेक शेतकरी नोंदणी करण्याचे राहिले होते. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेता शासनाने १० दिवसांची मुदत वाढवून दिली होती. या वाढीव मुदतीचा अनेक शेतकऱ्यांना फायदा झाला. दरम्यान, यंदा पीक विमा योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पिकांचे नुकसान झाल्यास ई-पीक पाहणी केलेली नोंद फायदेशीर ठरण्यास मदत होणार आहे.

गोंदिया जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार शेतकऱ्यांनी ई - पीक नोंदणी केली याचे २ लाख ६ हजार ७३२ हेक्टर क्षेत्र होत आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत विमा हप्ता म्हणून एक रुपया भरावा लागणार आहे. नुकसानापोटी ७० टक्क्यांप्रमाणे भरपाई मिळणार आहे. जिल्ह्यात धानाचे पीक घेतले जाते.

धानाला हेक्टरी ४८ हजारांचा विमा मिळणार आहे. यंदा १ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर असा ४५ दिवसांचा कालावधी ई- पीक नोंदणी करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्यानंतर १० दिवसांची मुदत वाढवून दिल्याने २५ सप्टेंबरपर्यंत ई- पीक पाहणी नोंदणी करता आली. गोंदिया जिल्ह्यात मागील आठवड्यात चांगला पाऊस झाला. या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करता आली नाही. त्यामुळे आता पुन्हा मुदतवाढ मिळणार का? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# गोमूत्र पवित्र आणि ओबीसी अपवित्र?

चातुर्वर्ण व्यवस्थेने चार वर्ण तयार केले. चौथा वर्ण शुद्र.जाती उतरंडीत शुद्रांना निम्न स्तरावर बंदिस्त केले. ओबीसी प्रवर्गात मागास-शुद्र जाती येतात. एखाद्या जागेवर त्यांनी एकत्र येऊन एखादा कार्यक्रम घेतला की ती जागा बाटली, अपवित्र झाली असं मानून गोमूत्र शिंपडून पवित्र केली जाते, हा ओबीसीचा धडधडीत अपमान आहे. ओबीसीसह मागासलेल्या जातींना निच समजणे होय. ओबीसीचे मत चालते, ओबीसीची मतं झोळीत पडावी म्हणून राज्याचे पक्षाध्यक्ष ओबीसी हवे असतात. शेतकरी-ओबीसी शेती करुन धान्य पिकवतात, ते अन्नधान्य भाजीपाला दही दूध तूप चालते. मात्र ओबीसी आपल्या न्याय्य हक्कासाठी एकत्र आलेले का चालत नाही? मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायात प्रजापतिर्हि वैश्याय सृष्टीवर परिददे पशून् ब्राम्हणाय च राज्ञे च सर्वाः परिददे प्रजा:( ओवी ३२६) अर्थात, प्रजापती ने पशु निर्मिती करुन तीण विश्वास दिली आणि इतर प्रजा (शुद्र,वैश्य) हे निर्माण करुन त्यांच्यावर ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे स्वामित्व प्रस्थापित केले. अशा प्रकारे ब्राम्हणेतरांना गुलाम करणारे विचार लादलेले आहे.

ओबीसी शिक्षण, राजकारण, नोकऱ्या, उद्योग, व्यापार इ. क्षेत्रात पुढे जाणे म्हणजे, उच्चजात प्रस्थापितांना एकप्रकारे आव्हान ठरते. म्हणून ओबीसींना मागे ठेवण्यासाठी, ओबीसीचा आत्मविश्वास खाली खेचण्यासाठी ओबीसीला अपमानित केले जाते. यावरुन ओबीसीला ओबीसी आरक्षण असल्याविना त्यांच्या वाट्याला येणारी लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व क्षेत्रात सत्ता व राजकीय, प्रशासकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, न्यायिक, धार्मिक, कला-साहित्य, प्रसार माध्यमे यांमध्ये सहभागाविना न्याय्य वागणूक मिळू शकणार नाही, याची खात्री पटते. नागपूर येथील वज्रमूठ सभेतील बहुतांश नेते ओबीसी मराठा आदि मागास ब्राम्हणेतर आहेत. अनेक नेते धूर्त, चाणाक्ष, मातब्बर, मुरब्बी, पारंगत राजकारणी आहेत. तरी त्यांना त्यांच्या शुद्रजातीमुळे असे अपमानित व्हावे लागते. ही जातीद्वेषावर आधारित मानसिकता समाजाचं वास्तव आहे. सद्यस्थितीत सर्वाधिक गरिब आणि हतबल हवालदिल ओबीसी समाज आहे. शेतीव्यवसायाशी निगडित देशाचा पोशिंदा समजण्यात येणारा हा समाज अत्यंत दयनीय असुरक्षित अपमानास्पद अवस्थेत आहे. सबब ओबीसीला सर्व क्षेत्रात न्याय्य वाटा मिळाला पाहिजे म्हणून ओबीसीचे जातीनीहाय जनगणना आंदोलन पेटले आहे. त्या आंदोलनात ओबीसी विरोधक भस्म होतील, या भयास्तव ओबीसीला अपमानित-प्रताडित केले जात आहे. तुलसीदास रचित रामचरित मानस सांगते, ‘ढोल, गंवार, शुद्र, पशु, नारी,सकल ताडना के अधिकारी’ या दंडकाने आणि धर्मशास्त्राच्या न्यायाने ओबीसीला अपवित्र ठरवून ते एकत्रित झालेल्या जागेवर गोमूत्र सिंपडून ती जागा पवित्र केली जाते. गाईचं गोमूत्र किती पवित्र! आणि ओबीसी अपवित्र?

आणि मग गोमूत्र शिंपडणाऱ्यांच्या कळपात घुसलेले कसे पवित्र होतात. त्याठिकाणी वज्रमूठ सभेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रमुख ब्राम्हणेतर राजकीय धुरीण एकवटलेले असताना सभेची जागा अपवित्र झाल्याच्या गमजा मारत पुन्हा एकदा महाराष्ट्रात कलंकित घटनांची पुनरावृत्ती तर पेशवाईची वंशवेल करु पहात नाही?

खरंतर ही उच्चनीच मानसिकता वर्णव्यवस्थेने दृढ केलेली आहे. पिढ्यानपिढ्या ती टिकवण्याचे, जिवंत ठेवण्याचं काम जातसमर्थक उच्चजातींनी कसोशीने केले. संत तुकाराम महाराजांचे विद्रोही संतत्व जेव्हा सामान्य माणसाची चेतना बनू पाहते तत्क्षणी तुकारामांना शुद्रांना धर्मशास्त्राची चिकित्सा करण्याचा अधिकार नाही म्हणून सनातनी कंपू कडून ताकिद दिली जाते. त्याच मानसिकतेतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला आव्हान दिले जाते. गागाभट्टास पाचारण करुन शिवाजी महाराजांना दुसरा राज्याभिषेक करुन छत्रपती पदाला अधिमान्यता मिळवून घ्यावा लागते.

तर ‘धर्मेप्सवस्तु धर्म ज्ञा: सतां वृत्तमनुष्ठिता: मन्त्रवर्ज्यं न दुष्यन्ति द्रशंसा प्राप्नुवन्तिचें (ओवी १२६, मनुस्मृती, वे.शा.सं. पंडित रामचंद्रशास्त्री अंबादास जोशी, प्रकाशक-श्री ध. ह. सुरळकर,श्री गुरुदेव प्रकाशन, ७ रविवार पेठ,पुणे २) अर्थात, धर्मकार्य करु इच्छिणाऱ्या धर्मज्ञ शुद्रांना पंचमहायज्ञादि करावे. वैदिक मंत्र म्हणू नये. यामुळे त्यांची लोकात कीर्ती पसरते. या धर्माज्ञेच्या आधारे, छत्रपती शाहू महाराजांना तुम्ही शुद्र आहात म्हणून वेदोक्त मंत्रोच्चार करण्याचा अधिकार नाही असा पुरोहितशाहीने कांगावा केला. शाहू महाराजांच्या काळातील वेदोक्त प्रकरण महाराष्ट्राच्या मस्तकावरील पुरोगामीत्वाला प्रश्नांकित करु लागते. असे कितीतरी दाखले मिळतील ज्यातून जातीय अहंकारातून आजही शुद्रातिशुद्रांना निच समजले जाते. मात्र त्यांच्या कच्छपी लागलेले राजकीय हितस्वार्थाकरिता अशा कृत्यांचा निषेध करण्याऐवजी पक्षीय राजकारणाच्या आडून एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या राजकीय भूमिकेतून समर्थन करताना दिसतात. ही अतिशय खेदाची बाब आहे. वास्तविक पाहता भारतीय राजकारणात शुद्र जातींना किंवा नेतृत्वाला अजूनही राष्ट्रीय नेता मानायला प्रसारमाध्यमे आणि राजकीय पक्ष तयार नाहीत.

शुद्रातिशुद्र नेते अर्थातच ओबीसी-ब्राम्हणेतर आणि त्यांचे राजकीय पक्ष हे दुय्यम तिय्यम समजून मुख्य राजकीय प्रवाहाच्या बाहेर कसे फेकता येईल याकडे अधिक कटाक्ष असतो. आणि म्हणून राजकीय व्यवस्थेत बदल होण्यासाठी सामाजिक बदलाची पूर्वअट मान्य करणे अपरिहार्य ठरते. सामाजिक न्यायाशिवाय समता, स्वातंत्र्य, बंधुत्व प्रदान करणारी लोकशाही राज्यव्यवस्था वांझोटी ठरते. सद्यस्थितीत तर सत्तांतरणासाठी राजकीय पक्षांच्या हालचाली चालू असताना सत्ताधारी राजकीय शक्तीस पराभूत करण्यासाठी यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे. शुद्रांना अपवित्र समजून गोमूत्र शिंपडून हिन लेखणाऱ्या विचाराशी हा संघर्ष असेल त्यासाठी फुले शाहू आंबेडकर ही विचारधारा राजकीय लढ्यासाठी अंगिकारणे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरेल. ओबीसी-बहुजनांना हीन समजून, गायीच्या गोमुत्रापेक्षाही हीन समजून वज्रमूठ सभेची जागा शुद्ध करणे ही केवळ राजकीय बाब राहत नाही, तर ती मानवामानवांमध्ये भेद मानण्याची तुच्छ मानसिकता प्रदर्शित करते. अशा अमानवीय प्रवृत्तीचे उच्चजात समूह समाज व्यवस्थेतील आपली श्रेष्ठत्वाची एकाधिकारशाही शाबूत ठेवण्यासाठी अशा प्रकारचे उद्योग निरंतर चालू ठेवतात. आपले कुटील डाव समजले तर लोक आपल्यावर चवताळून येतील अशी या गोमूत्र प्रेमींना भिती वाटू नये? ब्राम्हणेतरांना कितीही तुच्छ वागणूक दिली तरी आपलं कोणीच काही बिघडवू शकत नाही, हा दर्प उच्चजात अहंकारी मानसिकतेतून आलेला आहे तोच अशा कुरापती करण्यासाठी जात समर्थकांना उद्युक्त करत राहिलेला आहे.

आता जातिभेद उरले नाहीत. जातीजातीत रोटीबेटी व्यवहार होतात, त्यावरील बंधनं सैल झालेली आहे, मिश्रजाती विवाहसंबंध जुळू लागले आहेत, कित्येक ब्राम्हणही आता पुरोगामी होऊ लागले आहेत, असे समजणाऱ्या भाबड्या ओबीसी भावंडानो! ओबीसीचा विटाळ घालवण्यासाठी मारलेली गोमूत्राची पवित्र मेख समजून घ्यावी लागेल.

**- अनुज हुलके**

# बेवारस भूखंडांना पालिकेने दिली ओळरव

## त्या जमिनी पालिकेच्या नावावर: दीर्घकालावधीनंतर झाली प्रक्रिया

**गोंदिया:** गोंदिया नगरपालिकेने शहरातील विविध भागांत वेगवेगळ्या प्रयोजनांकरिता भूखंड खरेदी करुन आरक्षित केले होते. मात्र ते भूखंड अद्यापही पालिकेच्या नावावर तलाठी कार्यालयात चढविण्यात आलेले नव्हते. त्यामुळे अनेक भूखंडावर अतिक्रमण करण्यात आले. कित्येक भूखंडांच्या कागदपत्रांत हेराफेरी करुन जागा हडपण्यात आली होती. त्या भूखंडांना पालिकेची मालकी मिळावी, याकरिता संपूर्ण ताकदीनिशी गतवर्षी प्रयत्न झाले. अखेर प्रक्रिया पार पडली. आता ते भूखंड पालिकेच्या नावावर झाले असून त्या भूखंडांची मालकी पालिकेकडे आली आहे.




गत अनेक वर्षापुर्वी शहराचा वाढता व्याप आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरात ठिकठिकाणी भूखंड खरेदी करुन ते विविध उपयोगाकरिता आरक्षित ठेवण्यात आले होते. कित्येक वर्ष लोटले असताना देखील ते भूखंड पालिकेच्या नावावर नव्हते. त्यामुळे अडचण निर्माण होऊन त्या भूखंडांवर माफियांनी डोळा टाकला होता. ते भूखंड पालिकेच्या अख्त्यारित यावे, यासाठी नगर रचना विभागाचे तत्कालीन सभापती जितेंद्र पंचबुद्धे यांनी पाठपुरावा केला. त्यामुळे ते भूखंड पालिकेच्या नावावर करण्यात आले. तसेच भूखंडांचे पुन्हा मोजमाप करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

आरक्षण क्रमांक एन २० ही जागा कुडवा येथे प्राथमिक शाळेकरिता आरक्षित करण्यात आली होती. तसेच गोंदिया बुज. येथील आरक्षण क्रमांक एन १० ही जागा खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित करण्यात आली. मात्र ती जागा तलाठी कार्यालयात फेरफार झाली नव्हती. ते फेरफार पालिकेच्या नावाने करण्यात आले.

एन ७० ही गोंदिया बुज. येथील आरक्षित ०.७६ हेक्टर जमीन प्राथमिक शाळेकरिता आरक्षित होती. त्या भूखंडांवर देखील पालिकेची मालकी करण्यात आली. त्या भूखंडांवर लवकरच विकासात्मक कामे होती घेण्यात येणार आहेत. त्या भूखंडापैकी सूर्याटोला पाणीटाकीच्या कुडवा येथील ०.६५ हेक्टर जागेचा विकास करुन बाग तयार करण्यात येणार आहे.

टीबीटोली येथील खसरा क्रमांक ५५२,५४५ अंतर्गत येणाऱ्या ०.२६ हेक्टर जागा सातबारावर चढविण्यात आली आहे. या सर्व भूखंडांचा विषय मार्गी लागला असून लवकरच विकासात्मक कामे हाती घेण्यात येणार आहेत.

### अनेकांनी हडपल्या जमिनी

**गोंदिया नगर पालिकेचे खरेदी केलेले भूखंड राजकीय आणि असामाजिक तत्वांच्या दबावाला बळी पडून भूमी अभिलेख विभागाने दस्ताऐवजात हेराफेरी करुन खरेदी करण्यात आलेले भूखंड कमी दाखवून दस्ताऐवज तयार करण्यात आले होते. हा विषय देखील गंभीरतेने हाती घेण्यात आला असून त्या जमिनीचे पुन्हा मोजमाप करण्यात येणार आहे. गोंदिया शहरातील मामा चौकातील जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले असून भूमी अभिलेखच्या दस्ताऐवजावर कमी दाखविण्यात आली आहे. त्या जमिनीचे मोजमाप करुन हे प्रकरण मार्गी लावण्यात येणार आहे. पिंडकेपार येथील बगीच्याकरिता आरक्षित जमीन देखील कमी दाखवत असून त्याचे देखील पुन्हा मोजमाप करण्यात येणार आहे. पालिकेच्या भूखंडांच्या हेराफेरीत भूमी अभिलेख विभागाची भूमिका संशायास्पद आहे. या विभागाने पालिकेच्या जमिनी दुसऱ्यांच्या नावे चढविण्यात आला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.**

> **शहरातील विविध भागात विकासाच्या योजना राबविण्याकरिता कराच्या पैशांतून भूखंड खरेदी करण्यात आले होते. मात्र आतापर्यंत ते भूखंड पालिकेच्या नावावर नव्हते. आता ती प्रक्रिया करण्यात आली असून नागरिकांच्या हिताकरिता कामे करण्यात येत आहेत.**
> **करण चव्हाण, मुख्याधिकारी न.प.गोंदिया**

# उत्पादन खर्चाच्या तुलनेत धानाच्या दरातील वाढ तुटपुंजीच

## शेतकऱ्यांना दरवर्षी बसतोय फटका: शासन मात्र दखल घेईना

**गोंदिया:** उत्पादन प्रक्रियेत उत्पादन घेणाऱ्या व्यक्तिंना उत्पाादित मालाचे दर निश्चित करण्याचा अधिकार आहे. मात्र, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या धान्याचा दर ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. तर तो अधिकार शासनाकडे आहे. पण गेल्या पाच ते सहा वर्षात धानाला देण्यात आलेला हमीभाव व दुसरीकडे वाढत असलेला महगाईचा आलेख पाहता शासनाकडूनच शेतकऱ्यांची थट्टा केली जात आहे.

मागील पाच वर्षाचा आलेख पाहता धानाच्या उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ झाली असतानाही भावात केवळ २९० रुपयांची वाढ झाली आहे. ही वाढ फारच तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांना याचा दरवर्षी फटका बसत आहे.

**पाच वर्षात धानाचे हमीभाव**

| वर्ष | मिळालेला भाव |
|---|---|
| २०१८-१९ | १७५० |
| २०१९-२० | १८१५ |
| २०२०-२१ | १८६८ |
| २०२१-२२ | १९४० |
| २०२२-२३ | २०४० |

मागील पाच वर्षाचा विचार करता सर्वसाधारण दर्जाच्या धानाला शासनाने १०१८-१९ मध्ये १ हजार ७५० रुपये भाव जाहीर केला होता. तर दुसऱ्या वर्षी म्हणजेच सन २०१९-२० या वर्षी केवळ त्यात ३५ रुपयांची वाढ करुन १ हजार ८१५ रुपये देण्यात आले. तर त्यानंतरच्या २०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामासाठी ५३ रुपये प्रती क्विंटल दरात वाढ करुन १ हजार ८६८ रुपये दर जाहीर केला.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता शासनाने हमी भावात ७२ रुपयाची वाढ करुन १ हजार ९४० रुपये दर दिला. त्यानंतर गेल्या आर्थिक वर्षात राज्यात सर्वत्र ओल्या दुष्काळाचे सावट असतानाही केंद्र शासनाने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली व केवळ १०० रुपये दर वाढवून २ हजार ४० रुपये दर शासनाकडून जाहीर केले होते.



### खर्च व दरात तफावत

**विशेष म्हणजे धानाचे दर हे कासव गतीने वाढविण्यात येत असतानाच दुसरीकडे रासायनिक खते, औषधांचे दर चारपटीने वाढू लागले आहे. त्यामुळे धानाचे दर रासायनिक खताचे व यात फार तफावत असून आम्हीच उत्पादित केलेल्या धान्यांचे दर ठरविण्याचा अधिकार आम्हाला कधी मिळणार? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.**

### शेतकऱ्यांची व्यथा कोण समजणार

**महागाई वाढली म्हणून शासनस्तरावरुनच ओरड सुरु होते. जीवनावश्यक वस्तूचे दर वाढविले जाते. उत्पादन खर्चाच्या तुलनेत उत्पादक वस्तूच्या किंमती ठरवितात. स्वत: मजूर देखील मजुरीचे दर वाढवित असतात. याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. शेतीची कामे करण्यासाठी मजूर येत नाही. परिणामी मजूरी वाढवून द्यावी लागते. मात्र, त्या तुलनेत बाजारात धानाला दर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. हे वास्तव असतानाही शासनाकडूनही योग्य दर दिले जात नसल्याने आता शेतकऱ्यांची व्यथा कोण समजणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

# जिल्हा ग्रामसेवक युनियनच्याा वार्षिक अधिवेशन व पतसंस्था आमसभेत आदर्श ग्रामसेवकांचा सत्कार




**गोंदिया:-** येथील मयूर लॉन येथे महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनचे वार्षिक अधिवेशन व गोंदिया जिल्हा ग्राम विकास अधिकारी ग्रामसेवक पतसंस्थेची आमसभा अध्यक्ष कमलेश बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर सभेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर व गट विकास अधिकारी गोंदिया आ.पो.पिंगळे यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करुन उत्कृष्ठ ग्रामसेवकांचा सत्कार करण्यात आला.

**सन २०२०-२०२१ आदर्श ग्रामसेवक ए डी कावळे देवरी, कु.मंगला गजानन आगासे (पं.स गोरेगाव), पि एम चव्हाण (पं. स सालेकसा),एस बी पटले (पं. स.आमगाव),डब्लू बी कांबळे (पं. स तिरोडा),ये जी कासारे (पं. स.सडक अर्जुनी),पी वाय नगराळे (पं. स अजुनी मोरगाव),एन.एच मेश्राम (पं. स गोंदिया).**

**सन २०२१-२२ आदर्श ग्रामसेवक टी बी कुबडे (पं.स.देवरी),कु .ज्योती ई बीसेन(पं.स सालेकसा),विजय एन बिसेन (पं.स.आमगाव),रीना उत्तम शहरे (पं.स.गोरेगाव),विलास रामकृष्ण मशराम तिरोडा,कु.एस आर सूर्यवंशी( पं.स.सडक अर्जुनी), पी.एम.पवार (पं.स.अर्जुनी मोरगाव),पी.सी मेश्राम (पं.स.गोंदिया).**

**सन २०२२-२३ आदर्श ग्रामसेवक श्री. तुलसीदास रामनाथ वाघमारे (पं.स देवरी)श्री.पांडुरंग श्रीराम हरींनखेडे (पं.स.गोरेगाव)कु.रोहिणी मारोती ऊके (पं.स.सालेकसा),नरेंद्र एच. चौधरी (पं.स.आमगाव), शैलेश रतीराम परिहार (पं. स तिरोडा),.टिकाराम रामजी जनबंधू (पं. स अर्जुनी मोरगाव),एल डी तावाडे (पं.स.गोंदिया),ओमेश्वर एन कापगते (पं.स.सडक अर्जुनी).**

सदर अधिवेशनात सर्वप्रथम सेवानिवृत्त कर्मचारी यांचे शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह व भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला यामधे पुरुषोत्तम एम. समरीत, कुशोबा टी. बाळणे, देवराम एस मेश्राम, विनोद जे. रोकडे, प्रेमलाल ए. भिलकर, बेनिप्रसाद एस. तूरकर,एस .सी .तागडे यांचा समावेश होता. तद्नंतर पदोन्नती द्वारे विस्तार अधिकारी झालेले पदोन्नती सभासदांचे सत्कार शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह सह टेनिलाल डी. बिसेन, पुंडलिक आर.कुटे, अतुलकुमार. डी.पवार, कार्तिक एस.चव्हाण, छत्रपती आर.काटगाये, यशवंत सी.पटले, चंद्रभुषण आर.सहारे, अनिल सी.राणे, कांतीकुमार एस.सेंदूरकर यांचा सत्कार करण्यात आला. सन २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ या वर्षात झालेल्या आठ गटातील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच सरतेशेवटी नव्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था सार्वत्रिक निवडणुकीत ग्रामसेवक संवर्ग मधून निवडून गेलेले मुख्य कार्यकारी पद सचिव म्हणून निवडून गेलेले कमलेश बिसेन, संचालक म्हणून निवडून गेलेले हंसराज गजभिये,सचिन कुथे, ओमेश्वर बिसेन, अजय रामटेके, रितेश सहारे, दिलीप शेंडे, रेखा अतकरी ,दयानंद फटिंग यांचे सत्कार करण्यात आले .

सत्कार समारंभ पार पडले नंतर अध्यक्ष कमलेश बिसेन यांचे द्वारे पतसंस्था आमसभा अहवाल वाचून दाखविण्यात येवून अनेक धोरणात्मक निर्णय सर्व संमतीने घेण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी सभेला संबोधित केले व काळ परिस्थिती नुसार स्वतःत बदल करुन अधिक पारदर्शक व डिजिटल स्मार्ट वर्क करण्याची गरज. प्रतिपादन करुन लोकाभिमुख काम करण्याचे निर्देश दिले .

गोविंद खामकर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही अनेक येणारे नविन आवाहन व त्यावर उपाय बद्दल मार्गदर्शन केले गट विकास अधिकारी ओ पी पिंगळे यांनी काम करीत असताना शिस्त व पारिवारिक एकोपा ठेऊन प्रशासकीय कामे सहज सुलभ करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले यावेळी कार्यक्रम नियोजन कार्तिक चव्हाण, सूत्र संचालन कुलदीप कापगते प्रास्ताविक कमलेश बिसेन तर आभार शैलेश परिहार यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील सर्व ग्राम विकास अधिकारी व ग्रामसेवक उपस्थित होते .

# भाजप किसान आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी माजी जि.प.अध्यक्ष नेतराम कटरे व राजेंद्र पटलेंची निवड



**गोंदिया:-** भारतीय जनता पाटी किसान आघाडीच्या प्रदेश कार्यकारीणीची घोषणा आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गणेश किसनराव भेगडे यांनी केली.यामध्ये गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व भाजपचे जेष्ठ नेते नेतराम कटरे यांची प्रदेश कार्यकारीणीत उपाध्यक्षपदी निवड केली आहे.सोबतच भंडारा जिल्ह्यातील शेतकरी हक्कासाठी लढणारे इंजि.राजेंद्र पटले यांचीही प्रदेश उपाध्यक्षपदावर निवड करण्यात आली आहे.

# गोंदियात नागपूर कराराची होळी

## विदर्भ संकल्प पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन

**गोंदिया:-** विदर्भ राज्य आंदोलन समितीच्यावतीने स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी गुरुवार २८ सप्टेंबर रोजी नागपूर कराराची होळी करत केंद्र व राज्य सरकारचा निषेध केला. दरम्यान शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात समितीच्या वतीने नागपूर कराराची होळी करण्यात आली. या प्रसंगी गोंदिया जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, विदर्भवादी नेते वसंत गवळी, जिल्हा उपाध्यक्ष भोजराज ठाकरे, जिल्हा महासचिव सी. पी. बिसेन, सुनील भोंगाडे, अरुण बनाटे, दीपा काशीवार, पंचशीला पानतावणे, विकी ठाकर आदिंसह विदर्भप्रेमी उपस्थित होते.

२८ सप्टेंबर १९५३ ला झालेल्या नागपूर कराराप्रमाणे विदर्भाला बळजबरीने विदर्भाच्या जनतेची इच्छा नसताना महाराष्ट्रात सामील करुन घेतले, नागपूर करारात दिलेल्या ११ कलमांपैकी बहुतांश कलमा पाळल्या गेल्या नाही म्हणून नागपूर करार हा संपुष्टात आला. विदर्भातील जनतेचा बॅकलॉग वाढला आहे. त्याचे दुष्परिणाम म्हणून ४७ हजार शेतकऱ्यांची आत्महत्या झाली. बेरोजगारांची फौज वाढली, नक्सलवाद वाढला, कुपोषण वाढले आहे. यापासून मुक्ती व विदर्भाच्या सर्वांगीण विकासाठी स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती केंद्र सरकारने तत्काळ करावी, अशी मागणी विदर्भ राज्य आंदोलन समितीने करीत नागपूर कराराच्या प्रतींची होळी केली.




यावेळी केंद्र व राज्य शासनाविरोधात घोषणा देत निषेध केला. यानंतर स्वातंत्र्याच्या लढाईचे प्रतीक असलेले आष्टी (शहीद) जिल्हा वर्धा येथून विदर्भ संकल्प पदयात्रेला ३० सप्टेंबर रोजी प्रारंभ होईल. यात्रा तळेगाव-आर्वी- कौंडण्यपुर अशी जाणार असून २ ऑक्टोबर रोजी विदर्भ संकल्प महिला मेळावा व रुक्मिणीला साकडे आंदोलन करण्यात येणार असून विदर्भप्रेमींनी यात सहभागी होण्याचे आवाहन समितीच्यावतीने या प्रसंगी करण्यात आले.

# अभिसरण योजनेतून २५ लक्ष रुपयांच्या निधीत महिला बचत गट भवनाचे निर्माण होणार



**गोंदिया :** आमदार विनोद अग्रवाल यांच्या स्थानिक विकास निधीतून गोंदिया विधानसभा मतदारसंघातील कारंजा गावात अभिसरणाच्या माध्यमातून २५ लाख रुपयांच्या निधीतून मंजूर झालेल्या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. महिला बचत गटाच्या इमारतीच्या बांधकामामुळे गावातील महिलांना बचत गटाच्या बैठका आयोजित करण्याबरोबरच लघुउद्योग करण्याची सुविधा मिळणार आहे. आमदार विनोद अग्रवाल यांच्या संकल्पनेतून प्रत्येक गावात महिला बचत गट भवन स्थापन करण्यात येणार आहे. महिला बचत गटाच्या इमारतीच्या बांधकामामुळे परिसरातील महिलांना व्यापारी केंद्र उपलब्ध होणार आहे.

आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नाने अभिसरण योजनेतून विधानसभा मतदारसंघातील जवळपास सर्वच गावांमध्ये गेल्या ३ वर्षांपासून महिला बचत गटाच्या इमारती बांधल्या जात आहेत. यासाठी महिलांनी जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांचे आभार मानले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात या प्रकारची संकल्पना केवळ गोंदिया विधानसभा मतदारसंघात राबविली जात असून या कार्यक्रमाचे भूमिपूजन महिलांच्या हस्ते करण्यात आले

भूमिपूजनाच्या या कार्यक्रमात प्रामुख्याने रोहित अग्रवाल, नोकचंद कापसे ग्राम पंचायत सरपंच कारंजा, उपसरपंच विठ्ठलराव हरडे, तसेच ग्राम पंचायत चे सर्व सदस्य, चाबी संघठन चे सर्व पदाधिकारी व अन्य गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १५ ऑगस्टपर्यंत सुरु करण्याची घोषणा फोल, ओबीसी विद्यार्थ्यांची समस्या कायम



**गोंदिया:** राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय चार वर्षापुर्वी घेतला होता. ही वसतिगृहे १५ ऑगस्टपर्यंत सुरु करण्याची घोषणा पावसाळी अधिवेशनात ओबीसी कल्याण मंत्र्यांनी केली होती. त्यासाठी जिल्हा मुख्यालयी दोन इमारती भाड्याने घेण्यासाठी प्रस्ताव सुद्धा शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र करारनामा कोण करणार हा पेच निर्माण झाल्याने व यावर शासनाचे अद्यापही कोणतेही दिशार्निदेश न मिळाल्याने या वसतिगृहाचे घोडे अडले आहे.

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाघी प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वसतिगृह सुरु करण्याची शिफारस ५ ऑक्टोबर २०१५ रोजी बैठकीत केली होती. यात १५ जानेवारी २०१९ ला मान्यता मिळाली. बाबू जनजीवनराम छात्र आवास योजनेंतर्गत शंभर विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उभारण्याचे काम नियोजन आहे. मुलांच्या वसतिगृहांसाठी केंद्र सरकार ६० टक्के तर राज्य सरकारला ४० टक्के रक्कम देणार आहे.

या प्रस्तवाला मंजुरी मिळाल्यानंतर निधीची तरतूद करुन काम सुरु केले जाणार होते. मंजुरी मिळाल्यापासून दोन वर्षात या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करण्याची अट होती. मात्र अद्यापही जागा मिळाली नाही. केवळ हेच कारण पुढे करुन अशासकीय संस्थांना वसतिगृहांची जवाबदारी देण्याच निर्णय घेतला. या संस्था कंत्राटी पदभरती करुन वसतिगृहाचे कामकाज चालविणार असल्याने ओबीसी संघटनांनी आंदोलन केले होते. त्यामुळे हा निर्णय बदलून शासनाने स्वत: इमारत भाड्याने घेवून वसतिगृह चालविण्याचा निर्णय घेतला होता. तसेच १५ ऑगस्टपर्यंत हे वसतिगृह सुरु करण्याची घोषणा केली होती. पण ही घोषणा आता हवेत विरली आहे.

# सरपंच साहेबांची वक्रदृष्टी फिरली! चक्क सार्वजनिक विहिरीवर मोटर पंप

## ■ कुंपणाने शेत खाल्ले दाद मागावी कुणाकडे
## ■ दोन वर्षापासून मोटारपंपाद्वारे पाण्याची होताहेत वाहतूक

देवरी:- तालुक्यातील ग्रामपंचायत शिलापूर अंतर्गत शिलापूर गावातील विर बिरसा मुंडा चौक येथील सार्वजनिक विहिरीवर मोटारपंप लावून स्वतः सरपंच साहेबांनी नियमाचे उल्लंघन करीत असल्याची बाब समोर आली आहे. सरपंच स्वतःच नियमाचे उल्लंघन करीत असेल तर, गावाचा विकास कसा होईल. असे शिलापूरवाशीयांचे म्हणणे आहे. सरपंचावर वचक कुणाचे? असा असा प्रश्न ग्रामवशियाना पडला आहे.

सविस्तर असे की, देवरी तालुक्यातील गट ग्रामपंचायत शिलापूर अंतर्गत शिलापुर या गावातील विर बिरसा मुंडा चौक येथे पुरातन काळापासून सार्वजनिक विहीर प्रशासनाकडून बांधण्यात आली आहे. या विहिरीतील पाण्यावर गावातील असंख्य कुटुंब अवलंबून आहेत. या सार्वजनिक विहिरीचे पाणी गावकरी दैनंदिन जीवनात वापर करतात. म्हणजेच सार्वजनिक विहिर शिलापूर या गावातील जनतेसाठी जीववाहिनी ठरत आहे.

परंतु, या विहिरीवर सरपंच साहेबानी वक्रदृष्टी फिरवली असून, चक्क सार्वजनिक विहिरीवर मोटर पंप स्वतःच्या हितासाठी बसविलेला आहे. स्वतःच्या घरी विहिरीतील पाणी वाहून नेण्यासाठी मोटार पंपाद्वारे पाईपलाईन बसवून, या पाण्याचा वापर स्वार्थापोटी करीत आहे. गावकऱ्यांनी याविषयी सरपंचाला विचारपूस केली असता, सरपंच उडवा उडवीचे उत्तरे देत "बनेल तो करा" या भाषेच्या प्रयोग करीत आहे.

स्वतः सरपंच नियमाचा उल्लंघन करीत असेल तर, दाद कुणाला? मागावी. असा सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. या सरपंचावर प्रशासन काय कारवाई करेल?. असा प्रश्न गावकऱ्यांसमोर उभा आहे. "कुंपणाने शेत खाल्ले दाद मागावी कुणाकडे" अशी अवस्था शिलापूरवाशीयांची झालेली आहे.

### शोष खड्डा देतोय अपघाताला निमंत्रण

**विर बिरसा मुंडा चौक शिलापूर येथील सार्वजनिक विहिरीलगत मागील सहा महिन्यापूर्वी घन व्यवस्थापनेतून शोष खड्डा तयार करण्यात आले. परंतु या शोष खड्ड्यावर सुरक्षा कवच नसल्यामुळे, गावातील एखाद्या मनुष्यप्राण्याच्या केव्हाही अपघात होऊ शकतो. विर बिरसा मुंडा यांचा पुतळा असल्यामुळे, गावातील आदिवासी बांधव त्या ठिकाणी कोणतेही कायक्रम करीत असतात. कार्यक्रमांमध्ये लोकांची संख्या जास्त असल्यामुळे या उघड्या शोष खड्ड्यावर एखाद्या व्यक्तीचा तोल जाऊन त्याच्या अपघात होऊ शकतो. असे स्थानिक गावकऱ्यांचे म्हणणे आहे. अपघात झालास तर याची जबाबदारी कोण? घेणार असा प्रश्न शिलापूर ग्रामस्थांना पडला आहे.**



> बिरसा मुंडा चौक शिलापूर येथे पुरातन काळापासून असलेली सार्वजनिक विहीर ही संपूर्ण गावातील लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करीत असते. स्वतः ग्रामपंचायत सरपंचाने या सार्वजनिक विहिरीवर मोटार पंप लावून, आपल्या स्वघरी पिण्याच्या पाण्याची वाहतूक करीत आहे. यावर सरपंचाला विचारले असता, सरपंच यांनी उडवा उडवी चे उत्तरे दिले आहे.
> **मुन्ना टेंभुरकर,** ग्रामस्थ शिलापूर
>
> स्वतः सरपंचाने मोटर पंप बसवला असून, नियमाचे उल्लंघन केले आहे. यावर प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे. मोटर पंप सुरूअसताना विहिरीतील पाण्याची पातळी ही खाली जात असून, गावकरी लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. सरपंच स्वतःच गुन्हा करीत असेल तर आम्हाला न्याय कोण देणार?
> **मुकुंदराव भोयर,** ग्रामस्थ शिलापूर
>
> ग्रामसभेत सदर बाब निदर्शनात आणून दिली असता, गावचे सरपंचानी उडवा उडवीची उत्तरे ग्रामवशियाना दिली आहेत. विहिरीनजिक सहा महिन्यापूर्वीपासून बनविण्यात आलेल्या शोष खड्ड्यावर झाकण नसल्यामुळे, अपघात केव्हाही होऊ शकतो. या बाबींवर शासनाने आम्हाला लवकरात लवकर न्याय द्यावा.
> **सचिन मेळे ,** ग्रामस्थ


## जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

### ग्रामपंचायत कार्यालय धाबेटेकडी/आदर्श, पंचायत समिती अर्जुनी/मोर.

ह्या सुचने द्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, मासिक सभा ठराव क्रमांक ११ दिनांक १३/०९/२०२३ अन्वये ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ.येथे १५ **वा वित्त आयोग** अंतर्गत प्रस्तावित धाबेटेकडी/आ. येथे **१) समाज भवन दुरुस्ती करणे (पंचायत समिती स्तर)** चे कामे करण्याकरिता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक ०४/१०/२०२३ ते दि.११/१०/२०२३ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फार्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीस च्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक ११/१०/२०२३ ला दुपारी ठीक ३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.E-mail-gpdhabetekdi24@gmail.com, सदर निविदा ही पुढील महिन्याच्या ग्रामपंचायत मासीक सभेमध्ये (शक्य झाल्यास) सर्व संबंधितांसमोर उघडण्यात येईल. सर्व माहिती व अटी शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमूना ७ निविदा फार्मची किंमत | निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम १% | निविदा स्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम २% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **समाज भवन दुरुस्ती करणे (पंचायत समिती स्तर)** | १७००००/- | ५००/- | १७००/- | ३४०० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ.**

**सरपंच**
**ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ.**

# भरडाईसाठी दिलेले धान राईस मिल धारकांकडे उपलब्ध नसताना मागीतली मुदतवाढ

## राज्य शासनाचा अजब कारभार, शासकीय धान्य अपहाराचे गुन्हे कधी?

**विष्णू वैरागडे**

**गडचिरोली:–** पणन हंगाम २०२२–२३ करीता किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंत घेतलेले धान गडचिरोली जिल्ह्यातील राईस मिल धारकांना फोटीफाईड सीएमआर तांदूळ भरडाईसाठी दिलेले धान परस्पर खुल्या बाजारात विकले असताना शासकीय धान्य अपहाराचे गुन्हे दाखल करण्याऐवजी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव सतीश सुपे यांनी केंद्र शासनाकडे धान नसलेल्या राईस मिल धारकांसाठी परत एक महिन्याची मुदतवाढ मागितल्याने मंत्रालयात देखील पाणी कुठे तरी मुरत असल्याची जोरदार चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.

सन २०२२ –२३ या हंगामातील १७ लक्ष क्विंटल तांदूळ केंद्र शासनाला पुरवठा करणे गडचिरोली जिल्ह्यातील काही राजकीय नेत्यांच्या दबावाखाली व माहिती अधिकार कार्यकर्ते यांच्या वारंवार होत असलेल्या हस्तक्षेपामुळे अशक्य झाले असल्याची सबब पुढे करुन गडचिरोली जिल्ह्यातील राईस मिल धारकांनी धान भरडाई करण्याचे काम थांबवले आहे. यासोबतच भारतीय खाद्य निगमचे गुणवत्ता तपासणी करणारे राईस मिल धारकांनी शासनाला पुरवठा केलेला तांदूळाची गुणवत्ता तपासणी करण्यास राजकीय नेत्यांच्या हस्तक्षेपामुळे धजावत नसल्याने नमुद करुन पुन्हा एक महिना धान भरडाई करुन फोटीफाईड सीएमआर तांदूळ पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभाग उप सचिव यांच्या कडे मुदतवाढ प्रस्ताव दि २६ सप्टेंबर २०२३ ला सादर केला आहे.

खरं तर राईस मिल धारकांनी गडचिरोली जिल्ह्यातील टीडीसी व डीएमओ कार्यालयाकडून धान वितरित केल्या नंतर दहा दिवसांत फोटीफाईड सीएमआर तांदूळ भरडाई करुन जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कडे जमा करणे बंधनकारक आहे. मात्र, जिल्ह्यातील राईस मिल धारकांनी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे. मागील वर्षी दिलेल्या धानाचा फोर्टीफाईड सीएमआर तांदूळ अद्यापही शासनाला जमा केलेला नाही .

८ ऑगस्ट २०२३ प्रादेशिक व्यवस्थापक गजानन कोटलावार यांना राईस मिल धारकांना नियमबाह्य पद्धतीने धान वितरण करुन प्रती क्विंटल धान भरडाई करीता सर्वसाधारणपणे किमान ०.८ युनिट वीज खर्च होत असल्याचे खातरजमा न करता, बँक गॅरंटी पेक्षा अधिक धान वाटत केल्याचा ठपका ठेवून निलंबित केले आहे. मात्र, शासनाने मिल धारकांना अभय दिले आहे. प्रादेशिक व्यवस्थापकांनी या प्रकरणी आपले उखळ चांगलेच पांढरे केले असल्याने मिल धारकांवर शासकीय धान अपहाराचा गुन्हा




दाखल करण्याऐवजी स्वतःचाच बळी दिला असल्याचे सांगितले जात आहे.

२१ नोव्हेंबर २०२२ च्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या परिपत्रकानुसार गिरणीधारक असल्याबाबत सबळ पुरावे घेण्याबाबत जिल्हा समन्वयक समितीच्या जबाबदाऱ्या असुन फार्टीफाईड सीएमआर तांदूळ भरडाईसाठी दिलेले अनेक अस्तीत्वातच नसुन बरेच राईस मिल बंद अवस्थेत आहेत. काही राईस मिल धारक फोटीफाईड सीएमआर तांदूळ भरडाई न करता खाण्यायोग्य नसलेला नित्कृष्ट दर्जाचा तांदूळ पुरवठा करण्यात येत असून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

वास्तविकत: सद्यस्थिती गडचिरोली जिल्ह्यातील राईस मिल धारकांकडे फोटीफाईड सीएमआर तांदूळ भरडाईसाठी टीडीसी व डीएमओ कार्यालयाने दिलेला तोच धानच जाग्यावर उपलब्ध नसताना कुठला तांदूळ जमा करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव सतीश सुपे यांनी केंद्र शासनाकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला असा प्रश्न उपस्थित केला जात असुन महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभाग १७ लाख क्विंटल तांदळाची विल्हेवाट लावण्यासाठी मुदतवाढ मागितली जात असल्याचे बोलले जात आहे.

# मिनी मंत्रालयाची पदभरती झाली कोट्यधीश

## १२२२२ अर्ज दाखल :१ कोटी १० लाखांचा महसूल गोळा

**गोंदिया.** जिल्हा परिषदेतील रिक्त जागांच्या नोकरभरतीसाठी प्रक्रिया सुरू आहे. यासाठी ऑनलाईन पद्धतीने थेट भरती प्रक्रिया ३ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. ही परीक्षा प्रत्येक संवर्गनिहाय स्वतंत्रपणे होणार आहे. गोंदिया जिल्हा परिषदेतील १९ संवर्गातील ३३९ पदे या भरती प्रक्रियेत भरली जाणार आहेत. त्याकरिता उमेदवारांकडून आकारण्यात आलेल्या अर्ज शुल्कामुळे १२ हजार २२२ उमेदवारांकडून शासनाच्या खजीन्यात १ कोटी १० लाख रुपयांचा महसूल गोळा झाला आहे.

जिल्हा परिषदांमधील भरती प्रक्रिया जवळपास अकरा वर्षापूर्वी झाली होती. त्यामुळे मधल्या काळात अनेक कर्मचारी निवृत्त झाल्याने रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य सरकारने ७५ हजार पदांची भरती करण्याची घोषणा केली असून त्यात जिल्हा परिषदांमधील सर्व संवर्गामधील साधारणपणे १९ हजार पदे भरली जाणारआहेत. ही भरती रिक्त पदांच्या ८० टक्के जागांसाठी होत आहे. नोकरभरतीसाठी आयबीपीएस कंपनीने तयारी केल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. एक अथवा तीन शिफ्टमध्ये परीक्षा होईल, अशी माहिती देण्यात आली. या परीक्षेसाठी सर्वसाधारण उमेदवारांकडून एक हजार, मागासवर्गीय उमेदवारांकडून ९०० रुपये आकारण्यात आले आहेत.

जिल्हा गोंदिया जिल्हा परिषदेतील रिक्त पदांपैकी ३३९



### ही पदे भरणार

**आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेवक (पुरुष), आरोग्य सेवक (पुरुष), आरोग्य सेवक (महिला), औषध निर्माण अधिकारी, कंत्राटी ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / ग्रा.पा.पु.), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), कनिष्ठ आरेखक, कनिष्ठ यांत्रिकी, कनिष्ठ लेखाधिकारी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), कनिष्ठ सहाय्यक लेखा, जोडारी, पर्यवेक्षिका, पशुधन पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, यांत्रिकी, रिगमन (दोरखंडवाला), वरिष्ठ सहाय्यक (लिपीक), वरिष्ठ सहाय्यक लेखा, विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक((बांधकाम, लघुपाटबंधारे).**

### शुल्क अधिक तरीही गर्दी


**पहिल्यांदाच राज्य शासनाने राज्यस्तरावर एवढ्या मोठ्या प्रमाणात पदभरती काढली आहे. भरती प्रक्रिया शासन स्वत: न करता स्वत: न करता बाह्य स्त्रोतांच्या माध्यमातून भरती करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून पदभपरती निघाली नव्हती. त्यातच बेरोजगारीचे प्रमाण देखील वाढले. शासनाने यावेळी परीक्षा शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ केली. त्याच्यावर बेरोजगारांनी आगपाखड देखील केली. मात्र शासनाने निर्णय मागे घेतला नाही. अखेर उमेदवारांनी नाईलाजाने नऊशे ते हजार रुपये देवून अर्ज भरले. ३३९ जागांकरिता तब्बल १२ हजार २२२ अर्ज आल्यामुळे यावरून बेरोजगारीचा अंदाज बांधता येवू शकतो.**

जागा या भरतीतून भरण्यात येणार आहे. ती पदे १९ संवर्गातील आहेत. प्रामुख्याने गट क मधील जागा भरल्या जाणार आहेत. भरती प्रक्रियेसाठी ५ ऑगस्ट २०२३ पासून अर्ज मागविण्यास सुरुवात झाली होती. २५ ऑगस्ट पर्यंत अर्ज स्विकारण्यात आले. गोंदिया जिल्हा परिषदेच्या पदभरतीसाठी आयबीपीएस या कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. या कंपनीमार्फत जिल्ह्यातील ३३९ पदांकरिता १२ हजार २२२ इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्ज स्विकारताना सर्वसाधारण आणि मागावसर्गीय उमेदवारांकरिता एक हजार आणि ९०० रुपये परीक्षा शुल्क आकारण्यात आले होते. त्यातून शासनाला अर्जाच्या माध्यमातून १ कोटी १० लाख रुपये महसूल मिळाला आहे.

# गोंदिया जिल्ह्याची हंगामी खरीप आणेवारी ०.९५ पैसे जाहीर

**गोंदिया:–** महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ चे कलम ७८ नुसार, पैसेवारीच्या अनुपातानुसार, जमीन महसुल तहकूब, कमी वा रद्द करण्यास समर्थन म्हणून, शासनाचा महसूल विभाग प्रत्येक गावातील कोरडवाहू, खरीप व रब्बी पिकांची पैसेवारी काढीत असतो. यालाच आणेवारी असा शब्द प्रचलित होता. २८ सप्टेंबरला गोंदिया जिल्हा प्रशासनाने काढलेल्या पैसेवारीनुसार गोंदिया जिल्ह्याची पैसेवारी ही ०.९५ पैसे एवढी काढण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ४ गावांची पैसेवारी ही ५० पैशाच्या खाली आहे.तर पिक नसलेल्या ३६ गावांची पैसेवारी जाहिर करण्यात आलेली नाही.तर ९१५ गावांची पैसेवारी ही ५० पैशाच्यावर आहे.

गोंदिया तालुक्यातील १५३ गावापैकी १४९ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर आहे. तालुक्याची पैसेवारी ९५ पैसे निघाली आहे. गोरेगाव तालुक्यातील ९९ गावापैकी ९४ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर आहे. तालुक्याची पैसेवारी ९६ पैसे निघाली आहे. तिरोडा तालुक्यातील १२५ गावापैकी १२३ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर आहे.तालुक्याची पैसेवारी ८७ पैसे



निघाली आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १५९ गावापैंकी १४८ गावांची पैसेवारी ५० पैसाच्यावर असून तालुक्याची आणेवारी ९१ पैसे आहे. देवरी तालुक्यातील १३५ गावांपैकी १२८ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर असून तालुक्याची पैसेवारी १.०८ पैसे आहे. आमगाव तालुक्यातील ८३ गावापैकी ८३ गावे ५० पैसाच्या वर असून तालुक्याची आणेवारी ९५ पैसे आहे. सालेकसा तालुक्यातील ९२ गावांपैकी ८६ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर असून तालुक्याची पैसेवारी ९० पैसे आहे. तर सडक अर्जुनी तालुक्यातील १०९ गावापैकी १०४ गावांची पैसेवारी ५० पैसाच्या वर असून तालुक्याची पैसेवारी ९९ पैसे असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर केला आहे.

### मूलभूत सुविधा,वनहक्क पट्ट्यांसाठी एकजुटीने प्रयत्न–आ.चंद्रिकापुरे

अर्जुनी मोरगाव–२०१५ ला नगरपंचायतची स्थापना झाली.मात्र त्या काळात हवे तसे विकास कामे झाली नाहीत.स्वच्छ पाणी,पक्के रस्ते गटारे,विद्युतीकरण,सार्वजनिक स्थळांचे सौंदयीकरणासारखी कामे नगरपंचायतची जबाबदारी आहे.शहरात ७७० अतिक्रमण धारक आहेत.मालकीचे भूखंड नसल्याने हे लाभाथी घरकुलासह अनेक योजनांपासून वंचित आहेत.२००९ पासून वनहक्काचे प्रकरणे प्रलंबीत आहेत.या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सामूहिक प्रयत्नाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी

## सह.पतसंस्थेची आमसभा उत्हासात

**गोंदिया–** गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित गोंदिया र.नं.१०२ ची पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आम सभा) जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या विशेष उपस्थितीत नुकतीच पार पडली.यावेळी सेवानिवृत्त सदस्यांचा तसेच वर्ग २ पदावर पदोन्नती झालेल्या सदस्यांचा स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी जी.आर.खामकर, मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे,शिक्षणाधिकारी कादर शेख तसेच संस्थेचे अध्यक्ष मनोज एम गोंडाने,उपाध्यक्ष आनंदकुमार आर चर्जे, सचिव कमलेश बिसेन ,शाखाप्रमुख सचिन कुथे तसेच संस्थेचे संचालक कुवरलाल रहांगडाले, हंसराज गजभिये, ओमेश्वर बिसेन,रितेश कुमार शहारे, अजय कुमार रामटेके ,मनोज भुरे, वीरेंद्र कुंभरे, दिलीप शेंडे ,सुनील राठोड ,चंद्रशेखर चौधरी, रेखा पारधी ,प्रेमलता बागडे, संगीता बिसेन ,दीपिका यादव ,नामदेव मेश्राम ,रविकुमार पटले, चंद्रकांत धपाडे तज्ञ संचालक दयानंद फटिंग व सीमा भगत हे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी सभासदांच्या पाल्यांचा वर्ग १० व वर्ग १२ मध्ये प्राविण्य प्राप्त, जिल्हा व राज्यस्तरीय खेळाडू व वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश प्राप्त विद्याथी यांचा सत्कार स्मृतिचिन्ह व रोख पुरस्कार देऊन प्रमुख पाहुणे संस्था सचिव तसेच संस्थेचे संचालक उपस्थितीत पडला.

सत्कार समारंभानंतर लगेच वार्षिक सर्वसाधारण सभेला सुरुवात करण्यात आली.संस्थेचे कार्यकारी प्रमुख सचिव कमलेश बिसेन यांनी आमसभा अहवाल वाचन करून सभेच्या विषय सूचीनुसार रीतसर विषय वाचनाला सुरुवात केली. विषयानुक्रमाने विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन आमसभेला जे विषय होते त्या सर्व विषयावर सभासदांची साधक–बाधक चर्चा होऊन सर्व विषय सर्वानुमते पारित करण्यात आले. सभेला आलेल्या सर्व मान्यवर अतिथी गण यांचे तसेच सर्व मान्यवर सभासद ,संस्था कर्मचारी यांच्या लाभलेल्या सहकार्य बद्दल संस्था सचिव कमलेश बिसेन यांनी मानले.

# "महावितरणचा वीज बिल भरणा तत्काळ करा",न्यायालयाचे गोंदिया जि.प.ला निर्देश

**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यातील बहुचर्चित असलेली अर्जुनी मोरगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना २४ ऑगस्टपासून जिल्हा परिषदेने विद्युत बिल न भरल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित होऊन बंद पडलेली आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेण्यात आली. न्यायालयाने तत्काळ ५० टक्के बिलाचा भरणा महावितरणला करुन पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, असे निर्देश जिल्हा परिषदेला दिले.

अर्जुनी मोरगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून अर्जुनी मोरगाव नगरपंचायतसह जवळ परिसरातील १५ गावांना नियमित स्वच्छ पाणीपुरवठा केला जात होता. राज्य सरकारकडून येणारे प्रोत्साहन अनुदान २०१९– २० पासून बंद झाल्याने व जिल्हा परिषदेने योजनेची देखभाल दुरुस्तीकरिता कुठल्याही निधीचा नियोजन न केल्यामुळे जून महिन्यापासून विद्युत बिल थकीत झाले.

बारा लाख रुपये विद्युत थकीत झाल्यामुळे जुलै महिन्यात विद्युत वितरण कंपनीने नियमानुसार नोटीस दिली आणि २४ ऑगस्ट रोजी विद्युत पुरवठा खंडित केला. त्यामुळे १५ गावांचा पाणीपुरवठा खंडित झाला. परिणामी नागरिकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

माजी जि.प. सदस्य किशोर तरोणे यांनी वारंवार पाठपुरावा केला. परंतु कुठलाही प्रतिसाद



मिळाला नाही. विद्युत पुरवठा खंडित होऊन पाणीपुरवठा बंद झाला. त्यामुळे किशोर तरोणे यांनी न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने २८ सप्टेंबरला घेतलेल्या निर्णयामध्ये जिल्हा परिषदेने तत्काळ उपाययोजना म्हणून ५० टक्के विद्युत बिलाचा भरणा महावितरणला करुन पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच ४ ऑक्टोबरला आपले म्हणणे सादर करावे असे निर्देश दिले.

आता उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन जिल्हा परिषद येणाऱ्या दिवसांत ५० टक्के विद्युत बिल भरुन योजना सुरुकरणार की नाही, याकडे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सर्व जनतेचे लक्ष लागलेले आहे.

# दोन दुचाकी चोरट्यांना अटक

**गोंदिया :** गोरेगाव पोलिसांनी दोन दुचाकी चोरट्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून पाच दुचाकी जप्त केल्या आहेत. प्रशांत राजकुमार सयाम (वय १९, रा. बिरडीटोला, ता. सडक अर्जुनी) व साहिल उमेंद्र बिसेन (वय १९, रा. बाह्मणी, ता. गोरेगाव) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

यातील आरोपी प्रशांत सयाम हा चोरीची दुचाकी चुलोद येथे विकणार असल्याची गुप्त माहिती गोरेगावच्या पोलिस पथकाला मिळाली. या माहितीवरुन पथकाने तिथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्याजवळ चोरीस गेलेली एमएच ३५/ एक्स ५२४० क्रमांकाची एचएफ डिलक्स ही दुचाकी मिळून आली. तसेच त्याच्याकडे अधिक तपास केला असता पुन्हा एफ झेड फाईव्ह (विना क्रमांकाची) व हिरो स्प्लेंडर प्रो दुचाकी (विना क्रमांकाची) मिळून आली.

पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्यामध्ये सहभागी असलेल्या साहिल बिसेन याचे नाव सांगितले. त्यावरून पोलिसांनी साहिलचे बाह्मणी हे गाव गाठून शोध घेतला असता त्याच्याजवळ एमएच ३५/ यू. २१७४ क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी मिळून आली. तसेच सटवा डव्वा येथे विना क्रमांकाची हिरो स्प्लेंडर दुचाकी मिळून आली. अशा एकूण पाच दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलिस निरीक्षक अजय भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक गोसावी, सहायक फौजदार राजकुमार पवार, पोलिस हवालदार रमेश पटले, पोलिस हवालदार सुनील वानखेडे यांनी केली.

# बकरा चोर सापडले दुचाकीसह मुद्देमाल जप्त

**गोंदिया :** ॲक्टीव्हा दुचाकीने बकरा चोरुन नेणाऱ्या तीन जणांना रावणवाडी पोलिसांनी ताब्यात घेतले. यातील आरोपींपैकी एक जण विधीसंघर्ष बालक आहे. यश योगेश करोशिया (वय १९, रा. चांदणी चौक, स्टॉपजवळ काटी, ह. मु. डब्लींग कॉलनी, गोंदिया), शक्ती आनंद कुवर (वय १९, रा. डब्लींग ग्राउंड गौतमनगर, गोंदिया) व सिव्हील लाइन गोंदिया येथील एक विधीसंघर्ष बालक अशी आरोपींची नावे आहेत. या तिन्ही आरोपींना पोलिसांनी ३० सप्टेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास शिरपूर येथून ताब्यात घेतले.

याबाबत सविस्तर असे की, मंगल बाबुलाल मस्करे (रा. मुरपार, ता. गोंदिया) हे ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास गावाशेजारी आपल्या मालकीचा बोकड व इतर शेळ्या चारत होते. यावेळी एमएच ३५/ ए. एस. ७९०२ क्रमांकाच्या ॲक्टीव्हा दुचाकीने आलेल्या तीन जणांनी रावणवाडी ते बालाघाट रस्त्यावरुन बकरा चोरुन नेला. याबाबतची तक्रार त्यांनी रावणवाडी पोलिसांत केली. दरम्यान तीन जण दुचाकीने एक बकरा विक्री करण्याच्या इराद्याने फिरत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. यावरुन पोलिसांनी मोठ्या शिताफिने ॲक्टीव्हा दुचाकी व एक बकरा अशा एकूण ५६ हजार रुपयांच्या मुद्देमालासह आरोपी यश करोशिया, शक्ती कुवर तसेच एका विधीसंघर्ष बालकाला ताब्यात घेतले.

# फिट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत सामान्य ज्ञान चाचणीचे आयोजन

**गोंदिया :** केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणीचे आयोजन सन २०१९ पासून करण्यात येत आहे. सन २०२२ मध्ये फिट इंडिया क्वीझ–२ चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना खेळाविषयक असलेले ज्ञान, कौशल्य इत्यादींसाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे. भारतीय खेळांचा समृध्द इतिहास, स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळ, भारतीय खेळाडू इत्यादींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे हा या चाचणीचा मुख्य उद्देश असून यामध्ये ३.२५ कोटीच्या बक्षिसांचे विद्यार्थी व शाळांना वाटप करण्यात आले.

याप्रमाणेच केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणीचे क्वीझ–३ चे आयोजन करण्यात येत आहे. बक्षिसांची रक्कम मागील वर्षासारखीच रुपये ३.२५ कोटी असणार आहे. संपुर्ण भारतभर यासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी ५ सप्टेंबर २०२३ पासून सुरु झाली असून ५ ऑक्टोबर २०२३ ही नोंदणी करण्यासाठी शेवटची तारीख आहे.

तरी गोंदिया जिल्ह्यातील सर्व शाळा व विद्यार्थ्यांनी https://fitindia.nta.ac.in या कार्यालयीन वेबसाईटवर नोंदणी करावी. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# प्रत्येकाने स्वच्छतेकडून समृध्दीकडे वाटचाल करावी–अनिल पाटील

**गोंदिया :–** वैयक्तिक स्वच्छतेसह सार्वजनिक स्वच्छता राखणे हे प्रत्येक नागरिकांचे आद्य कर्तव्य आहे. आपण आपले घर स्वच्छ करतो तसेच आपले गांव पण स्वच्छ केले पाहिजे, त्यामुळे सर्वाचे आरोग्य निरोगी राहील. अर्थातच प्रत्येकाने स्वच्छतेकडून समृध्दीकडे वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.



पंचायत समिती गोंदिया अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय कारंजा येथे "एक तारीख–एक तास" स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) नरेश भांडारकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) गोविंद खामकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) दिनेश हरिणखेडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) संजय गणवीर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ.महेंद्र गजभिये, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश सुतार, नेहरु युवा केंद्राच्या युवा अधिकारी श्रुती डोंगरे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.कांतीलाल पटले, पं.स.गटविकास अधिकारी आनंद इंगळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे, बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. सोनटक्के, जि.प.चे माहिती शिक्षण व संवाद तज्ञ अतुल गजभिये, कारंजा गावचे सरपंच लोकचंद कापसे, उपसरपंच विठ्ठलराव हरडे, ग्रामविकास अधिकारी राधेश्याम बहेकार यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

अनिल पाटील पुढे म्हणाले, स्वच्छ भारत मिशन कार्यक्रमांतर्गत १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत गोंदिया जिल्ह्यात "स्वच्छता ही सेवा"अभियान राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आपल्या सर्वांना "स्वच्छता ही सेवा" अभियान यशस्वी करायचे आहे. "एक तारीख–एक तास" या उपक्रमाला स्वच्छता लोकचळवळीचे स्वरुप देण्याकरीता प्रत्येकाला आपला एक तास स्वच्छतेसाठी द्यायचा आहे. स्वच्छता आपल्या सर्वांच्या दैनंदिनीतील महत्त्वाची बाब आहे. स्वच्छता आपल्या आयुष्यात समृध्दी आणते. आरोग्य आणि परिसराची स्वच्छता यांचा दृढ संबंध आहे असे सांगून श्री. पाटील पुढे म्हणाले, "कचरामुक्त भारत" थीम असलेल्या "स्वच्छता ही सेवा' अभियान दरम्यान स्वच्छता मोहिमेला लक्ष केंद्रीत करुन ग्रामीण भागातील बसस्थानके, रेल्वेस्थानक, पर्यटनस्थळे, ऐतिहासिक वास्तु, वारसा स्थळे, नदी किनारे, घाट, नाले आदीसह सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेकरीता जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी महाश्रमदानात उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन गावे कचरामुक्त करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

"स्वच्छता ही सेवा"हा उपक्रम संपूर्ण देशात सुरु आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने कारंजा या गावात स्वच्छतेची ही मोहिम आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व अधिकारी या उपक्रमात सहभागी झाले. गावकऱ्यांनी यापुढे आपल्या गावात शाश्वत स्वच्छता राहील यासाठी प्रयत्नरत राहण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी केले.

यावेळी गोंदिया जिल्हा कचरामुक्त होण्याकरीता शाश्वत स्वच्छेबाबत सामुहिक शपथ घेण्यात आली. त्यानंतर कारंजा गावात शालेय विद्यार्थ्यांची स्च्छतेबाबत प्रभात फेरी काढून शाश्वत स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा परिषदेचे माहिती शिक्षण व संवाद तज्ञ अतुल गजभिये यांनी केले.

कार्यक्रमास विस्तार अधिकारी आर.जे.बंसोड, सी.व्ही.गावड, कार्तिक चव्हाण, संगीता अग्रगवाल, स्वच्छता तज्ञ अभियंता सुर्यकांत रहमतकर, माहिती शिक्षण संवाद तज्ञ राजेश उखडकर, मुल्यमापन व सनियंत्रण तज्ञ विशाल मेश्राम, मनुष्यबळ विकास तज्ञ तृप्ती साकुरे, शालेय स्वच्छता तज्ञ भागचंद रहांगडाले, गट समन्वयक करुणा डोंगरे, उमेंद्र भगत, तेजप्रकाश पुंड, कांचन मेश्राम, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थी व कारंजा गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॉकफोर्ससोबतच्या चकमकीत एक नक्षलवादी ठार; १४ लाखांचे होते बक्षीस

**गोंदिया :** अनेक दशकांपासून नक्षलवादाच्या समस्येशी झगडत असलेल्या बालाघाट जिल्ह्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलवादाच्या निर्मुलनात व्यस्त असलेल्या हॉकफोर्सला २९ सप्टेंबर रोजी आणखी एका मोठ्या नक्षलवाद्याचा खात्मा करण्यात यश आले. २५ वर्षीय मलाजखंड दलमचा नक्षलवादी कमलू हा हॉकफोर्ससोबत झालेल्या चकमकीत ठार झाला. कमलू वर १४ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

हॉकफोर्सचे जवान जंगलात शोध मोहीम राबवित असताना त्यांची नक्षलवाद्यांशी चकमक झाली हे सर्व नक्षलवादी मलाजखंड दलमचे सक्रिय सदस्य होते. या चकमकीत नक्षलवाद्यांनी जवानांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हॉकफोर्सने केलेल्या गोळीबारात नक्षलवादी कमलू ठार झाला. ही घटना २९ सप्टेंबर रोजी



सकाळच्या सुमारास बालाघाट जिल्ह्यातील रुपझर पोलीस ठाण्याअंतर्गत कडला येथील जंगलात, कुंदल–कोद्दापार या ठिकाणी घडली.

बालाघाट पोलीस ठाण्याअंतर्गहे या वर्षातील तिसरे मोठे यश आहे. या पूर्वी २२ एप्रिलला प्रत्येकी १४ लाख रुपये बक्षीस असलेल्या एक महिला नक्षलवादी क्षेत्र कमांडर टांडा दलमची सुनीता आणि टांडा दलममधील एरिया कमांडर आणि सध्या विस्तार दलममध्ये कार्यरत असलेल्या नक्षलवादी कबीरच्या गार्ड असलेल्या खटिया मोचा दलममधील सरिता यांनाही चकमकीत ठार करण्यात आले होते. त्यांच्याकडून बंदुका, काडतुसे, मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांची शस्त्रे आणि खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले होते. २९ सप्टेंबर रोजी पुन्हा एकदा हॉकफोर्स आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या गोळीबारात हॉकफोर्स जवानांनी शौर्य दाखवून १ नक्षलवादी कमलूला ठार केले. कमलूकडे असलेली ३०–०६ रायफल जप्त करण्यात आली आहे. या घटनेनंतर पोलीस महानिरीक्षक संजय कुमार, बालाघाट जिला पोलीस अधीक्षक समीर सौरभ यांनी पोलीस मुख्यालयात पत्र परिषद घेऊन या घटनेला दुजोरा देताना सांगितले की, या चकमकीत आणखी काही नक्षलवादी जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेनंतर या घनदाट परिसरातील जंगलात शोधमोहीम तीव्र करण्यात आली आहे.